अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## निवडणूक आयोगावरुन आमचा विश्वास उडाला; गद्दारांना चिन्ह दिले : ठाकरे




**मुंबई** : पक्षासंबंधी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना निवडणूक आयोगाने चोमडेपणा केला आणि गद्दारांना चिन्ह दिलं, निवडणूक आयोगावरून आमचा विश्वास उडाला आहे, तो चुनाव आयोग नसून चुना लावणारा आयोग असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. भाजपला वाटेल ते काम आणि वाटेल तसं काम निवडणूक आयोग करत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. मोगँबोच्या कितीही पिढ्या उतरल्या तरीही शिवसेना संपणार नाही असंही ते म्हणाले.

उद्धव ठाकरे म्हणाले की, पक्षासंबंधी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना निवडणूक आयोगाने या गोष्टी करायला नको होत्या. रामविलास पासवान यांच्या मुलाला एक आणि त्याच्या काकाला एक चिन्ह दिली, पण ते दोघेही भाजपसोबत असल्याने त्यांचा पक्ष आहे. आता केंद्र सरकारला वाटेल तसा निर्णय निवडणूक आयोगाकडून घेतला जातोय. बाकी सगळं चोरता येतं पण आई-वडिलांनी केलेलं संस्कार चोरता येत नाही, ज्यांच्यावर संस्कार नसतात त्यांना चोरीचा माल लागतो अशी टीका उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटावर केली. तुम्ही नाव चोरलत, धनुष्यबाण चोरलात पण तुम्ही ठाकरे हे नाव कसं चोरणार, हे ठाकरे सगळं शिवसेना कुटुंब आहे असंही ते म्हणाले. आपले आई वडील अडगळीत टाकून दुसऱ्यांचे बाप चोरता, लोक चोराल, विचार चोरता येणार नाहीत असं उद्धव ठाकरे म्हणाले. ज्या हेतून शिवसेनेची स्थापना केली होती तो हेतू साध्य झाल्याचं समाधान आहे. ज्या ठिकाणी मराठी माणसाला स्थान नव्हतं त्या ठिकाणी आता शिवसेनेमुळे मराठी माणसाला सन्मान मिळतोय.

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.२८ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १५१ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## फुल्ल टेन्शन...



# ऐनवेळी कसब्याचा 'सामना' फिरवला बंडामुळे चिंचवडमध्ये तणाव वाढला

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सोलापूरकरांशी नेहमीच शेजारधर्म राखलेल्या पुण्यातील दोन विधानसभा मतदार संघातील पोटनिवडणुकीच्या निकालाविषयी वेगवेगळे आखाडे समोर येत असल्याने सत्ताधारी शिंदे- फडणवीस आणि विरोधात असलेली महाविकास आघाडी यांच्यात धाकधूक वाढली आहे. कसब्यात शेवटच्या क्षणी भाजपने जादूची कांडी चालवून 'सामना' अखेर फिरवल्याचे सांगण्यात येते तर पिंपरी चिंचवडमध्ये शिवसेनेचे राहुल कलाटे यांच्या बंडखोरीमुळे तिथे 'काटे की कट्टर' असेल. अनेक मंत्री, खासदार आणि ३०-४० आमदार अशी राजकीय जत्रा चिंचवड आणि कसब्यात भरली होती. दीड वर्षात लोकसभा आणि विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. त्यामुळे या दोनही मतदार संघांचा निकाल त्यावर परिणाम कारक ठरणार असल्याने २ मार्चच्या निकालाकडे उभ्या राज्याचे लक्ष लागून आहे.**



### रोड शो भाजपच्या पथ्थ्यावर...

कसब्यात ब्राह्मण समाजाची मते निर्णायक ठरणार आहेत. भाजपकडून ब्राह्मण बहुल शनिवार पेठ, सदाशिव पेठ; तसेच नवी पेठ या प्रभागात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी पुरेशी खबरदारी घेण्यात आली. दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांच्या कुटुंबात उमेदवारी न दिल्याने ब्राह्मण समाजात नाराजी असल्याचा सूर उमटला होता. मात्र, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा झालेला 'रोड-शो' भाजपच्या पथ्यावर पडल्याचे चित्र दिसले. शनिवार पेठ-सदाशिव पेठ या प्रभागांत ३५ हजारांहून अधिक, तर नवी पेठ, पर्वती या ठिकाणी १८ हजारांहून अधिक मतदान झाले. त्यामुळे या प्रभागातील नाराजीमुळे मतदार बाहेर पडणार नाहीत ही शक्यता भाजप कार्यकर्ते तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी दूर केल्याचे चित्र या ठिकाणी पहायला मिळाले.

### चिंचवडमध्ये कडवी झुंज...

पिंपरी चिंचवडचा एरिया म्हणजे अजितदादांची प्रतिष्ठा असते. त्यांनी कसब्याऐवजी चिंचवडच्या रणनीतीवर अधिक लक्ष ठेवले होते. तिथे महाविकास आघाडीचे नाना काटे, भाजपच्या अश्विनी जगताप यांच्यात सरळ लढत होत होती परंतु ऐनवेळी शिवसेनेतून बंडखोरी करत राहुल कलाटे हे मैदानात उतरले. तिरंगी लढतीमुळे अजितदारांना रात्रीचा दिवस करावा लागला. तिरंगी लढतीमुळे चिंचवडमध्ये कडवी झुंज असेल,असा अंदाज स्थानिक पत्रकारांनी वर्तवला आहे.कसब्यात सरळ लढत असल्याने कोण बाजी मारणार? तर चिंचवडमधील तिरंगी लढतीने मतविभागणीचा दणका तिघांपैकी दोघा कुणाला बसणार याविषयी पुण्यात तर्कवितर्क लढवले जात आहेत.



राज्यात नुकत्याच झालेल्या सत्तांतरांच्या पार्श्वभूमीवर या दोन्हीही मतदारसंघातील पोटनिवडणुकांमध्ये सार्वत्रिक निवडणुकांपेक्षा अधिक संघर्ष दिसला. दोन्हीही बाजूच्या कार्यकर्त्यांमध्ये दिवसभर असलेला तणाव पोलिसांसाठी डोकेदुखी ठरला. पुणे हे तसे सांस्कृतिक व सभ्य शहर म्हणून ओळखले जाते परंतु निवडणुकीत जे प्रकार झाले,त्याने विचारवंतांना मान खाली घालावी लागली. उमेदवार निवडताना जातीची गणिते पक्ष प्रमुखांकडून समोर ठेवली गेली. शिवाय मतदानासाठी पैसे वाटल्याचे प्रकार घडले. प्रचार खालच्या पातळीवर झाला.एकमेकांवर गुन्हे दाखल होईपर्यंत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. देवापुढे उपोषण करण्याची नामुष्की ओढवली.एकमेकांना बघून घेण्याच्या धमक्या दिल्या गेल्या.

कुठल्याही निवडणुकांमध्ये मतदानाच्या टक्केवारीवरून निकालाचे अंदाज बांधले जातात. पिंपरी व कसब्यात अत्यल्प मतदान झाले. या दोनही मतदार संघात भाजपची ताकत आहे. वास्तविक पाहाता जिथे भाजप असतो,तिथे मतदान जास्त होते,असा अंदाज नेहमीच वर्तवला जातो पण इथे मतदान कमी झाल्याने भाजप नेत्यांना तोंडात बोट घालण्याची वेळ आली. कमी मतदान झाल्याचा लाभ काँग्रेसला होतो, असेही म्हटले जाते. त्यामुळे कमी मतदानाचा फायदा महाविकास आघाडीला होणार काय? याविषयी राज्यात उत्सुकता पसरली आहे. एवढेच नाही तर या निकालाचे तीव्र पडसाद अर्थसंकल्पीय अधिवेशनातही उमटणार आहेत.

## दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : नई जिंदगी परिसरात राहणाऱ्या हुसेन गुलाब नदाफ (वय ५५) याने दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्या केली. सोमवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास त्याने घरातील छताच्या वाशाला दोरीने गळफास घेतला होता. त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

## पाय घसरताच महाजनांनी मुख्यमंत्र्यांना सावरले

सुराज्य/मुंबई

राजकारणात केव्हाही काही होऊ शकते हे आपण पदोपदी पहात असतो.एवढेच नव्हे तर राजकारणात कोण कुणालाही सावरून घेत असतात.मग त्यात पक्ष-मित्र-वैरी असा भेदभाव नसतोच.अशाच एका प्रसंगाचा प्रत्यय सोमवारी विधानभवनाच्या पायथ्याशी आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अधिवेशन संपवून पायऱ्या उतरत होते.



तेव्हा त्यांचा पाय घसरला. लागलीच शेजारी असणारे भाजप नेते गिरीश महाजन यांनी त्यांचा हात धरून त्यांना सावरले. हा क्षण पाहून महाजन हे पुन्हा संकटमोचक ठरले, अशी चर्चा विधानभवन परिसरात रंगली. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली. शिंदे-फडणवीस सरकारचे हे पहिलेच अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन २५ मार्चपर्यंत चालणार असून ९ मार्चला अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. विधिमंडळाचे कामकाज संपल्यानंतर विधानभवनातून बाहेर येताना मुख्यमंत्री शिंदे आणि महाजन यांच्या मैत्रीची एक झलक पहायला मिळाली.

विधानभवनातून बाहेर येत असताना पायऱ्यावरून उतरताना शिंदे यांचा तोल गेला. मात्र, त्यांच्या बरोबर चालणारे महाजन यांनी मुख्यमंत्र्यांना हात देत सावरले. त्यामुळे गिरीश महाजन हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठीही संकटमोचक ठरले.

## मंत्री दादा भुसेंनी २ रुपयांचा चेक घेऊन शेतकऱ्याला बोलवले

सुराज्य/सोलापूर

बार्शी तालुक्यातील शेतकरी राजेंद्र चव्हाण या शेतकऱ्यास सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत ५०० किलो कांदा विकल्यानंतर व्यापाऱ्याने दोन रुपयांचा चेक दिला आहे. या प्रकरणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी शेतकऱ्याची पट्टी व दोन रुपयांचा चेक यावरून राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. तसेच सोलापूर मार्केट यार्डातील सूर्या ट्रेडर्स या व्यापाऱ्याबाबत संताप व्यक्त केला.

शेतकरी राजेंद्र तुकाराम चव्हाण यांनी राज्य सरकारमधील दादा भुसे यांना कॉल करून व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला. याबाबत शेतकरी राजेंद्र चव्हाण यांनी माहिती दिली. 'मला दोन रुपयांचा चेक वटवण्यासाठी जवळपास ३०० रुपये खर्च येत आहे. याबद्दल मंत्री दादा भुसे यांना फोन केला होता. मग त्यांनी पुन्हा फोन केला. दादा भुसेंनी मालेगावला या असे उत्तर दिले. दोन रुपयांसाठी कुठे कुठे जाऊ, किती खर्च करू?', असा सवाल शेतकऱ्याने उपस्थित केला आहे. बार्शी येथील राजेंद्र तुकाराम चव्हाण (वय ५८ वर्ष, रा. झाडी बोरगाव, बार्शी, सोलापूर) या शेतकऱ्याने सोलापूर मार्केट यार्डात १७ फेब्रुवारी २०२३ ला जवळपास पाचशे किलो कांदा विकला होता. कांद्याचे दर घसरल्याने शेतकऱ्याला प्रतिकिलो १ रुपया प्रमाणे भाव मिळाला. मोटारभाडे, हमाली, तोलाई याचे पैसे वजा करून फक्त दोन रुपये शिल्लक राहिले होते. मार्केट यार्डातील सूर्या ट्रेडर्स या व्यापाऱ्याने दोन रुपयांचा चेक शेतकऱ्याच्या दिला होता. चेकवर तारीख देखील ८ मार्च २०२३ दिल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



### 'दोन रुपयांसाठी दादा भुसेंनी मालेगावला या म्हटले'

या प्रकरणी राजेंद्र तुकाराम चव्हाण यांनी माहिती दिली. 'दोन रुपयांचा चेक वटवण्यासाठी ८ मार्चला जायला जवळपास ३०० रुपये खर्च होत आहे. याबाबत शिंदे सरकारमधील कॅबिनेट मंत्री दादा भुसेंना कॉल केला होता. त्यांनी फोनवरून सर्व माहिती ऐकून घेतली. आणि पुन्हा फोन करून मालेगावला या असं उत्तर दिलं आहे. कांद्याचे दर घसरल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आहेत. आता राज्य सरकारमधील मंत्रीही थट्टा करत आहेत', अशी खंत यावेळी शेतकऱ्याने व्यक्त केली आहे.

## बाळे येथे अनोळखी वाहनाच्या धडकेने पादचारी तरुण ठार

**सोलापूर** : बाळे येथील मेंगाने नगराजवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने पादचारी तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात रविवारी रात्रीच्या सुमारास घडला.

बाळगंगाधर उर्फ गौरव कुमार तुळसे (वय ३० रा.जयमल्हार नगर,बाळे) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो काल रात्री आठ वाजेच्या सुमारास कामावरून घरी पायी निघाला होता. जयमल्हार नगर परिसरातील मेंगाने नगराजवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला आतिश (नातेवाईक) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. तो सोमवारी सकाळी पहाटे मयत झाला.मयत गौरव तुळसे हा अविवाहित असून त्याच्या पश्चात आई आणि बहीण असा परिवार आहे. या अपघाताची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

## इसमाची कर्जास कंटाळून आत्महत्या

**सोलापूर** : मंगळवार पेठ परिसरातील बुधले गल्लीत राहणाऱ्या एका ४५ वर्षीय विवाहित इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी घडली. लक्ष्मण सिद्धप्पा कडली (वय ४५) असे मयताचे नाव आहे. आज दुपारी तीन वाजता सुमारास त्याने घरातील छाताच्या पंख्याला लुंगीने गळफास घेतला होता. मयत लक्ष्मण हा पेट्रोल पंपावर कामाला होता. कर्ज झाल्याने त्याने हा प्रकार केला. अशी नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली.


## श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या जागेवर खासगी व्यक्तीचा दावा

**सोलापूर** : बारा ज्योतिर्लिंगापैकी सहावे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराची जागा आपल्या खाजगी मालकीची असल्याचा दावा संतोष पटवा नावाच्या व्यक्तीने केलाय. मात्र मंदिर देवस्थानाच्या विश्वस्तांच्या मते पटवा यांची जागा मंदिराच्या शेजारी आहे.

सरकारी रेकॉर्डमध्ये देखील मंदिर आणि भोवतालची सात एकर जागा सरकारी मालकीची असल्याची नोंद आहे. मग संतोष पटवा कोणाच्या पाठबळावर भीमाशंकर मंदिरावर दावा करतायत हा प्रश्न उपस्थित होतोय. अनादी काळापासून भीमाशंकराच हे मंदिर शिवभक्तांच श्रद्धास्थान आहे. दर्शनासाठी येत असतात. मंदिर खाजगी मालकीचं असल्याचा दावा संतोष पटवा नावाच्या व्यक्तीने केल्याचा दावा केल्याने खळबळ उडालीय. ही जागा मंदिराचे विश्वस्त सुखदेव कोडीलकर यांच्याकडून आपले काका पटवा यांनी विकत घेतल्याचा पटवा यांचा दावा आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



किती कष्ट पडतात, मला माहीत आहे...

| कल्याण |
|---|
| -------- |

| मेन बाजार |
|---|
| -------- |

## काँग्रेस भवनमध्ये दोन ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांमध्ये हाणामारी

### शहराध्यक्षांसमोरच घडला प्रकार



सुराज्य/सोलापूर

काँग्रेसभवनमध्ये दोन ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांमध्ये सोमवारी दुपारी चांगलीच हाणामारी झाली. विशेष म्हणजे हा प्रकार शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्यासमोरच घडला. संपूर्ण दिवसभर काँग्रेस भवनसह कार्यकर्त्यांमध्ये हा चर्चेचा विषय ठरला.

काँग्रेसभवनमध्येनेहमीप्रमाणे सोमवारी सकाळपासून कार्यकर्त्यांची रेलचेल सुरू होती. शहराध्यक्ष चेतन नरोटेही आपल्या केबीनमध्ये बसून कार्यकर्त्यांची हितगूज करत होते. त्याचवेळी हॉलमध्ये काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष आणि एका ब्लॉक अध्यक्षांमध्ये हमरीतुमरी सुरू झाली आणि काहीकाळात त्याचे पर्यावसन हाणामारीत झाले. यावेळी ब्लॉक अध्यक्षाने शहर उपाध्यक्षाला चांगलीच मारहाण केल्याचे सांगण्यात आले. हा प्रकार शहराध्यक्ष नरोटे यांना कळताच त्यांनी सोडवण्याचा प्रकार केला. मात्र तरीही दोघात हाणामारी सुरूच होती. शेवटी नरोटे यांनीच हे भांडण सोडवले. दुपारी झालेल्या या भांडणाची चर्चा सायंकाळपर्यंत काँग्रेस भवनमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये सुरू होती. काँग्रेसभवनमधील कोणत्याही कर्मचाऱ्यांनी याची माहिती कोणाला दिली नाही. आम्ही बाहेर होतो, सुटीवर होतो, अशी उडवाउडवीची उत्तरे त्यांनी वरिष्ठांच्या सांगण्यावरून दिल्याची चर्चा होती.

### समजूत घालून भांडण सोडवले: नरोटे



दोन ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांमध्ये गैरसमजुतीने वाद झाला. मात्र दोघांची समजूत घालून हा वाद सोडवला, यापुढे असे प्रकार करणे तुम्हाला शोभणारे नाही, असे सांगत वादावर पडदा टाकल्याचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी सांगितले.



## कारच्या धडकेने आजी-नातवाचा जागीच मृत्यू

सुराज्य/सांगोला

शेरेवाडी कटफळ येथे भरधाव जाणाऱ्या कारचालकाचे नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात किराणा दुकानासमोर थांबलेल्या आजी व नातूचा जागीच मृत्यू झाला तर पती-पत्नीसह तिघेजण जखमी झाले यावेळी वेगातील कार तशीच पुढे किराणा दुकानाची भिंत फोडून आत घुसली मात्र सुदैवाने दुकान मालक बाहेर असल्यामुळे बालंबाल बचावला.

हा अपघात रविवारी सायंकाळी चिकमहुद- दिघंची रोडवरील शेरेवाडी कटफळ ता. सांगोला येथे घडला. द्रोपदी शिवाजी आटपाडकर -५० व सिद्धेश्वर नामदेव काळेल -७ ( रा. कटफळ आटपाडकर वस्ती) असे मृत आजी व नातूचे नाव आहे तर नामदेव सदाशिव काळेल - ३५ व रुक्मिणी नामदेव काळेल -३० तसेच पिकअप चालक विष्णू बळीराम मेंगाने- जाधव रा. शिंगोर्णी ता. माळशिरस अशी जखमींची नावे आहेत. स्थानिक नागरिकांनी जखमींना उपचाराकरता दिघंची ता.आटपाडी येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले.

# दारूचे गोलमाल...

दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांना अटक केल्यानंतर राजधानीची दारू देशभर प्रसिद्धीच्या झोतात आली. सिसोदिया यांनी असे काय केले? अबकारी कर प्रकरणी त्यांना लागलीच अटक करून तुरुंगात टाकण्यात आला. सारा देश चकित झाला. आम आदमी पार्टीच्या तत्त्वांचा आदर्श पाहाता सिसोदिया असे करणार नाही, असे देशाला कदाचित वाटले असेल. यात राजकारण असेल, अशी शंकाही व्यक्त होत असावी. पण तिथून जी माहिती उजेडात येते आहे, ती पाहता कारवाईवर विश्वास ठेवावा लागेल असे दिसते. दिल्लीत उत्पादन शुल्क अर्थात अबकारी कर विभागाच्यावतीने सुरू केलेल्या नव्या मद्य धोरणावरून सिसोदिया यांची याआधी देखील अनेकदा चौकशी केली गेलीय. उपमुख्यमंत्री सिसोदिया चौकशीत सहकार्य करत नसल्याचे कारण सीबीआयने पुढे करत त्यांना अटक केली. दिल्लीचे मुख्य सचिव नरेश कुमार यांनी नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांना एक अहवाल सादर केला होता. सिसोदिया यांच्यावर त्यात ठपका ठेवण्यात आला होता. मद्यपरवाना देत असताना त्या बदल्यात कमिशन घेऊन तो पैसा आम आदमी पक्षाने पंजाब विधानसभा निवडणुकीत वापरला, असा आरोप सिसोदिया यांच्यावर आरोप आहे. दिल्ली उत्पादन शुल्क धोरण २०२१-२२ संदर्भात दाखल केलेल्या एफआयआरमध्ये सीबीआयने १५ व्यक्तींची नावे नोंदविली आहेत. सिसोदिया या यादीत सर्वात वर आहेत. नायब राज्यपालांच्या कार्यालयाने दिलेल्या निवेदनातील आरोपांचा हवाला देत एफआयआरमध्ये म्हटले आहे की, सिसोदिया, दिल्ली उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त अरवा गोपी कृष्णा आणि या विभागातील इतर दोन अधिकाऱ्यांनी मद्य परवाना घेणाऱ्या कंत्राटदाराला फायदा देण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. एफआयआरनुसार काही 'एल-१' परवानाधारक किरकोळ विक्रेत्यांना क्रेडिट नोट जारी



करत आहेत, ज्यामुळे सरकारला अवाजवी आर्थिक लाभ मिळत आहे. त्यांच्या खात्यामध्ये चुकीच्या एंट्री केल्या जात आहेत. ऑगस्ट २०२२ मध्येच सीबीआयने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सिसोदिया यांच्या घरी छापा टाकला होता. दिल्लीच्या नवीन मद्य धोरणात अनेक बदल सुचविण्यात आले होते. ज्यामध्ये मद्याची डिलिव्हरी, दुकाने पहाटे तीन वाजेपर्यंत उघडी ठेवणे आणि परवानाधारकांना अमर्यादित सवलती देण्यात आल्या. हे बदलांना २ मे २०२२ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. हे धोरण लागू होण्यापूर्वी मुख्य सचिव नरेशकुमार यांनी धोरणाची तपासणी करणे आवश्यक होते. ज्यांची त्याचवर्षी एप्रिलमध्ये नियुक्ती करण्यात आली होती. कुमार यांनी सदर धोरण तपासल्यानंतर त्या धोरणातील प्रक्रियात्मक त्रुटी आणि अनियमिततेवर बोट ठेवले. ८ जुलै २०२२ रोजी कुमार यांनी त्यांचा अहवाल उत्पादन शुल्क विभागाचे प्रमुख सिसोदिया यांना पाठवत त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे मागितली. याच अहवालाची एक प्रत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि नायब राज्यपाल सक्सेना यांनाही त्याच दिवशी पाठविण्यात आली. त्याचबरोबर मुख्य सचिवांनी दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाला देखील या धोरणातील कथित बेकायदेशीरपणा, मक्तेदारी आणि एक गटाच्या मनमानीबद्दलची माहिती पोलिसांना देऊन त्यांना याबद्दलची चौकशी करावी, अशी मागणी केली. आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने जुलै २०२२ मध्ये झालेल्या उत्पादन शुल्क विभागाच्या १५ दिवसांहून अधिक दिवसांत झालेल्या बैठकांचे चित्रीकरण गोळा केले. यामध्ये ११ आणि १२ जुलैच्या रात्री एक बैठक पहाटे पाच वाजेपर्यंत चालली असल्याचे निदर्शनास आले. आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने (ईओडब्ल्यू) उत्पादन शुल्क विभागाच्या सहाय्यक आयुक्तांना नोटीस बजावून नवीन धोरणाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करून ज्या कंपन्यांना मद्य परवान्यांचे बेकायदेशीर वाटप करण्यात आले आहे, त्याची माहिती मागवली. मुख्य सचिवांच्या अहवालानुसार, सिसोदिया यांनी उपराज्यपालांच्या मंजुरीशिवाय उत्पादन शुल्क धोरणात बदल केले. जसे की, निविदा परवाने देत असताना १४४.३६ कोटी माफ करणे. सिसोदिया यांनी कोविड साथीचे कारण पुढे करून उत्पादन शुल्क विभागाला आदेश दिले की, मद्यविक्रेत्यांना १४४.३६ कोटी रुपयांची माफी देण्यात यावी. सिसोदिया यांनी विदेशी मद्याचे दर सुधारून आणि बिअरसाठी प्रति केस ५० रुपये आयात शुल्क आकारणी वगळून मद्य परवानाधारकांना अवाजवी लाभ मिळवून दिला. यामुळे विदेशी मद्य आणि बिअर स्वस्त होऊन राज्याचा मोठा महसूल बुडाला. महसूल बुडवण्याचा प्रकार राज्याच्या हिताचा ठरत नाही. अरविंद केजरीवाल हे आपल्या पक्षाचा आदर्श नेहमीच सांगत असतात पण सत्तेत गेल्यानंतर अशा आदर्शाला पैशाची चटक कशी लागते हे दिल्लीच्या दारूतून स्पष्ट होते. सिसोदिया यांना अडकावण्यात भाजपचा हात असेल पण भाजपकडे बोट करताना केजरींनी देखील स्वतःचा चेहरा आरशात पाहाण्याची गरज आहे.

राष्ट्रीय विज्ञान दिन

# शालेय स्तरावर वैज्ञानिक दृष्टिकोनाचं काय?

भारतासाठी पहिले नोबेल पारितोषिक मिळवून देणारे शास्त्रज्ञ-संशोधक म्हणजे भारतरत्न सर - चंद्रशेखर व्यंकट रामन. भौतिकशास्त्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा प्रकाशाच्या विकिरणासंबंधी (रामन इफेक्ट) संशोधन करणारे - आणि ह्याविषयीचा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जागतिक पातळीवर सादर करणारे पहिले आशियाई शास्त्रज्ञ. युरोपातून समुद्रमार्गे भारतात परत येत असताना आकाशातील निळ्या रंगाने त्यांचे कुतूहल जागृत झाले. आकाश निळ्या रंगाचे का दिसते? अशा प्रश्नामधून त्यांचे संशोधन सुरू झाले. पाणी, बर्फ यांमधून प्रकाशाचे विकिरण (स्कॅटरिंग) यावर संशोधन सुरू केले. व यातूनच त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाची उत्तरे मिळाली! रामन इफेक्ट म्हणजे एक प्रकारचे प्रकाशाचे विकिरणच! प्रकाशाचे विकिरण हा एक दृश्य परिणाम आहे. अशा प्रकाशाचे किरण सरळ - जेव्हा आपल्या डोळ्यांत शिरतात, तेव्हाच आपल्याला प्रकाशाच्या अस्तित्वाची जाणीव होते. २८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी हा शोधनिबंध जगासमोर त्यांनी मांडला आणि त्यांना भौतिकशास्त्राचा अत्यंत मानाचा नोबेल पुरस्कार प्राप्त झाला. २८ फेब्रुवारी या दिनाचे वैज्ञानिक औचित्य साधून १९८७ पासून भारतामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. आज विज्ञानाच्या प्रगतीने 'जग हातात आलं' पण, वैज्ञानिक दृष्टिकोनाचं काय?

एकविसावं शतक हे ज्ञानाधिष्ठित व तंत्रज्ञानाचं युग आहे. आधुनिक जगात ज्ञानाला अनन्यसाधारण महत्व आहे. आपण 'विज्ञानयुग' आहे असं म्हणतो, कारण गेल्या दीडशे-पावणेदोनशे वर्षात, विज्ञानाची प्रगती फार प्रचंड वेगानं झालीय. हातातल्या मोबाईलमध्ये आता सर्व जग सामावलं आहे. शाळा स्तरावर भावी पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे, जिज्ञासू वृत्ती जोपासणे अशा उद्देशाने विज्ञान-शिक्षणाची आखणी व्हावी, अशी शिक्षणतज्ज्ञांची व समाजातील जबाबदार घटकांची अपेक्षा आहे. स्वतंत्रपणे विचार करणारी आणि कार्य करणारी व्यक्ती बनविणे, हे शिक्षणाचे ध्येय असायला हवे, पण आज अभ्यासक्रमात जास्तीत जास्त कंटेंट'वर भर देण्याचा प्रयत्न शाळांमधून होताना दिसतो. प्रयोगशाळा मात्र कमी कमी होत आहेत. त्यामुळे माहिती वाचायची आणि ती लक्षात ठेवून परीक्षा पास होणे असे अभ्यासाचे स्वरूप बनले आहे आणि त्यामुळे विज्ञान शिकणे आणि शिकविणे कंटाळवाणे वाटू लागले आहे.

विज्ञानयुगासाठी लागणारी कौशल्ये विद्यार्थ्यांत बनवणे आधुनिक काळात गरजेचे ठरणार आहे. आधुनिक युगात जीवनमूल्यही झपाट्याने बदलत जातात आणि या नवीन मूल्यांची शिकवण देण्यासाठी आधुनिक शिक्षणपद्धतीचा शाळेत वापर करावा लागणार आहे. ज्यांना विज्ञानाच्या क्षेत्रात करिअर करायचे आहे, त्यांच्यासाठी पुरेशी पायाभरणी करणे हाही शालेय अभ्यासक्रमातील विज्ञानशिक्षणाचा उद्देश असायला हवा. कोणत्याही पाठ्यक्रमातून त्या त्या विषयाबद्दल विद्यार्थ्यांत रूची निर्माण होणे, विद्यार्थ्यांमधील जिज्ञासा जागी करणे, मनात आलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे गरजेचे आहे. त्यासाठी शालेय शिक्षणात विज्ञानाची प्रभावीपणे रुजुवात करण्यासाठी त्रिसूत्री प्रारूपाची आवश्यकता आहे. पहिली म्हणजे शाळेत पारंपरिक पद्धतीचे शिक्षण असले तरी त्याचा उद्देश केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे आणि परीक्षेची तयारी करणे असा नसावा, तर विद्यार्थ्यांच्या प्रश्न विचारण्याच्या वृत्तीला प्रोत्साहन द्यायला हवे. शिवाय शिक्षकांनी त्यांना अधूनमधून प्रश्न विचारून विषय समजला आहे किंवा नाही, याची चाचपणी, तपासणी करायला हवी.

दुसरा म्हणजे प्रयोगशाळेतील शिक्षणाचा. अमेरिकेत साठ वर्षांपूर्वी प्रयोगातून शिक्षण' यावर शालेय शिक्षणपद्धतीत भर दिला. विज्ञानातील संकल्पनांच्या आकलनास ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरते. त्यांचे समग्र आकलन होते. पण आज शाळेतील प्रयोगशाळांची अवस्था वाईट आहे. शालेय स्तरावर इनोव्हेशन करण्याची प्रेरणा ज्या वयात विद्यार्थ्यांना मिळायला हवी त्या वयात विद्यार्थी काहीतरी भलतंच करत असतो. शाळांमधून नव निर्मितीचा ध्यास घेण्यांच शिक्षण प्रशिक्षण मिळतच नाही. त्यात शाळेचा किंवा शिक्षकाचा तरी काय दोष ? कारण त्यांच्याकडे रिसोर्सेस तरी कुठे असतात. म्हणून आपल्या केंद्र सरकारने अटल टिंकरिंग लॅबोरेटरीज' (ढ्ढ) या नावाचा कार्यक्रम तयार केला आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मितीची संस्कृती (इनोव्हेशन) बिंबवणे हा त्याचा उद्देश आहे. अत्याधुनिक इनोव्हेटर्स तयार करणे याच उद्देशाने या लॅब तयार केल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना डिझाईन माईंडसेट, कम्प्युटेशनल थिंकिंग आणि ॲडेप्टिव्ह लर्निंग इ. कौशल्य, स्किल तयार होणं अपेक्षित असणार आहे.

थोडक्यात समोर शिक्षकांनी उभे राहून एखादा प्रयोग किंवा प्रात्यक्षिक करून दाखवायचे आणि विद्यार्थ्यांनी बघून माना डोलावून समजले असे सांगायचे अशी संकल्पना यात नाही. ऊर्ळींीशिश्रष या तत्वानुसार विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेतील उपकरणे आणि सुविधा वापरून विज्ञान,



तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित या विषयांतील संकल्पना शिकण्याची संधी मिळणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स, रोबोटिक्स, सेमीकंडक्टर बोर्डस, सेन्सर्स, थ्री डी प्रिंटर्स व कॉम्प्युटर या बाबतीत प्रयोग करून स्वानुभव घेता येतो. इनोव्हेशन आणि इन्व्हेन्शन दोन्हीही गोष्टी विद्यार्थ्यांना मारूनमुटकून शिकवून जमत नसतात. त्या चौकसबुद्धी, चुणचुणीतपणा आणि मेहनतीचा परिपाक असतात. प्रश्न शोधण्याची नजर आणि उत्तर शोधण्याची चिकाटी लागते. हे सर्व शाळेत शिकता, शिकवता येत नाही. ते आपलं आपल्यालाच घडवावं लागते.

तीसरी त्रिसूत्री म्हणजे फिल्ड व्हिजिट. विद्यार्थ्याला प्रश्न पडतो मी जे शिकतो आहे, त्याचा उपयोग काय? तो पडणे स्वाभाविकही आहे. विद्यार्थांना जर उद्योगांमध्ये, संशोधन प्रयोगशाळांमध्ये नेले तर प्रत्यक्ष आयुष्यात शिक्षणाचा उपयोग कसा होतो, हे त्यांना समजेल. शिक्षणाचा आणि बाहेरच्या जगाचा काय संबंध आहे, याचीही नेमकी कल्पना त्यांना येईल. शिवाय त्यामुळे शाळेतील शिक्षणाबद्दलची त्यांची आस्थाही वाढू शकते. पण आज विज्ञान-शिक्षणाकडे चांगली' नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक पात्रता कमावण्याचे साधन म्हणून बघीतले जाते. या सर्व गोंधळातून आज विज्ञानाची एक अशी शिक्षणपद्धती अस्तित्वात आली आहे, की जी कोणाचेच समाधान करत नाही. भारतात सुपर डुपर इफिशियंट आय टी कन्सल्टन्ट तयार होतात. मायक्रोसॉफ्ट, गुगल, फेसबुकमधे महत्वाच्या पदावर, जबाबदारीची कामं करणारे टेक्निशियन्स भारतातून निघू शकतात. पण मायक्रोसॉफ्ट, गुगल, फेसबुक जन्माला घालू शकतील असे इनोव्हेटर्स आपल्याकडे का घडत नाहीत याचा विचार शालेय स्तरापासून करायला हवा.

विद्यार्थी मित्रांनो विज्ञानाला अवघड, क्लिष्ट समजून चालणार नाही. विज्ञान अभ्यासात निरीक्षण, माहितीचे संकलन, तुलना, वर्गीकरण, कार्यकारणभाव, स्पष्टीकरण, निष्कर्ष काढणे, सामान्यकरण, उपयोजन, प्रयोग कौशल्य, तंत्रज्ञानाचा वापर सामाजिक जाणीव अशा क्षमतांचा प्रामुख्याने विचार केला जातो. विज्ञानातील माहितीचे अध्ययन करताना या क्षमतांचा वापर करावाचा लागतो. तसंच आपण आपल्या जीवनाशी निगडीत प्रत्येक घटनेकडे जोपर्यंत विज्ञानाच्या चष्म्यातून पाहत नाही तोपर्यंत आपल्याला विज्ञान समजणार नाही. शालेय स्तरावर शिक्षकांच्या विज्ञान शिकविण्याच्या क्षमता काळानुसार बदल व सुदृढ कराव्या लागतील. शिक्षकांनाही प्रोत्साहन मिळावे अशा गोष्टी कराव्या लागतील. शिक्षकांनाही वेळ, साधने आणि संधी पुरविल्यास विज्ञान शिक्षणातील अपेक्षित बदल व विद्यार्थ्यांनमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होऊ शकेल. चला तर मंग शालेय स्तरावर विज्ञान शाखेच्या त्रिसूत्री वापरून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान दृष्टिकोन निर्माण करू...आपल्या देशाच्या प्रगती आणि शांततेसाठी कार्यरत असणाऱ्या सर्व वैज्ञानिकांना विज्ञान दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

**- प्रा. तात्यासाहेब काटकर, अकलूज.**
(९२२६१४४८३६)


टुडेज् ब्लॉग

# जगण्याची भीषण वास्तवता - म्होरक्या

६५व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट बालचित्रपटाचा पुरस्कार मिळालेला 'म्होरक्या' चित्रपट नुकताच अमेझॉनवर प्रदर्शित झाला आहे. स्वस्तिक प्रीती फिल्म प्रॉडक्शन निर्मित आणि 'ऐसपैस'ची प्रस्तुती असलेल्या सिनेमाचे लेखन व दिग्दर्शन अमर देवकर यांनी केले असून त्यांचा हा पहिलाच चित्रपट आहे. ग्रामीण जीवनातील वास्तव जीवनाचे यथार्थ चित्रण यातून प्रभावीपणे मांडले आहे. म्हणूनच हा सिनेमा काळजाला हात घालतो व विचार करायला भाग पाडतो.

समुदायाचे नेतृत्व करायला प्रत्येकाला आवडते. याची सुरुवात लहानपणी शाळेतच होते. कुणाला वर्गाचा मॉनिटर व्हायला आवडते. कुणाला पहिला नंबर काढायला आवडतो. कुणाला खेळात 'टॉप' राहायला आवडते, तर कुणाला लेझीम पथकाचे नेतृत्व करायला, मात्र प्रत्येकाच्या वाट्याला 'लीडरशीप' येतेच, असे नाही. लेखक-दिग्दर्शक अमर देवधरने त्यांच्या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या 'म्होरक्या' चित्रपटातून लोकशाहीतील नेतृत्वाबद्दल भाष्य करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

प्रजासत्ताक दिनी शाळेत होणाऱ्या परेडचे नेतृत्व करायला मिळावे यासाठी संघर्ष करणाऱ्या चौदा वर्षीय मुलाची कथा आणि व्यथा 'म्होरक्या' चित्रपटात मांडण्यात आली आहे. बार्शीतील एका खेडेगावातील अशोक ऊर्फ आश्या (रमण देवधर) याला परेडची खूप आवड असते, मात्र केवळ भाग न घेता लीडर बनावे अशी त्याची इच्छा असते. त्याच आवडीपोटी तो शाळेत जातो, मात्र आश्याला त्याच्या शेळ्या-मेंढ्या सांभाळून शाळा शिकावी लागते. त्यामुळे शाळेत नियमितपणे उपस्थित राहणे त्याला शक्य होत नसते; परंतु परेडचे खूळ त्याच्या डोक्यातून जात नाही. परेडमधला खणखणीत आवाज





सगळ्यांचेच लक्ष वेधून घेतो. आश्याला लाभलेला आवाज जमेची बाजू ठरते, मात्र गावातील पाटलाचा मुलगाही परेडच्या लीडर'च्या स्पर्धेत असतो. आश्याला कोंडी आणि अडचणीमध्ये पकडण्यासाठी तो सर्वतोपरी प्रयत्न करतो.


परेड शिकण्यासाठी आश्याला त्याच्या गावातील वेडा अण्णा (अमर देवधर) याची मदत होते. अण्णा आश्यातील 'लीडर' हेरून त्याला परेड शिकवतो. शेवटी प्रजासत्ताक दिन उजाडतो. आश्याची आई आणि आजीसह अण्णा तसेच त्याच्या सहकाऱ्यांमध्ये परेडची उत्सुकता ताणली जाते. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या आश्याला परेडचे नेतृत्व करण्याची संधी मिळते का, हा सस्पेन्स आहे. आश्या आणि वेडा अण्णा ही दोन्ही पात्रे प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतात. प्रेक्षकांना पडलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सिनेमाच्या उत्तरार्धात मिळते. तसेच दिग्दर्शकाला त्या कथेपलीकडील सांगायची गोष्टही आपल्यापर्यंत पोहोचते.

लेखक-दिग्दर्शक म्हणून अमर देवधरचा पहिलाच चित्रपट असला तरी दोन्ही आघाड्यांवर तो सहजपणे वावरला आहे. संवाद आणि सिनेमाच्या पटकथेची मांडणी सिनेमाच्या मूळ गोष्टीला न्याय देणारी आहे. रमण देवधरने आश्या सर्वोत्कृष्ट साकारला आहे. अण्णा नामक वेड्याला अमर देवधर यांनी न्याय दिला आहे. रमणसह यशराज कऱ्हाडे हे बालकलाकार तसेच रामचंद्र धुमाळ, अनिल कांबळे, सुरेखा गव्हाणे यांनी आपापल्या भूमिकांना न्याय दिला आहे. सर्वोत्कृष्ट बालचित्रपटासह बालकलाकार रमण देवकर आणि यशराज कऱ्हाडे यांना अभिनयासाठी विशेष उल्लेखनीय कामगिरीचा पुरस्कार मिळाला आहे. आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, अभिनेते यांचा हा पहिलाच चित्रपट आहे. तरीही सिनेमाने राष्ट्रीय पुरस्कारावर नाव कोरले. या व्यतिरिक्त 'म्होरक्या'ने अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्येही ठसा उमटवला आहे.ग्रामीण जीवनातील वास्तव जीवनाचे यथार्थ चित्रण यातून प्रभावीपणे मांडले आहे. म्हणूनच हा सिनेमा काळजाला हात घालतो व विचार करायला भाग पाडतो.

**- आशिष निनगुरकर.**

जन्म हा अखेरचा

## ज्ञानाचारस्थल



कारण त्या प्रिय वाटतात. परंतु ज्या श्रेयस्कर नव्हेत, जिच्यामुळे जन्म-मृत्यूच्या चक्रातून जीवात्म्याची सुटका होते, ती मुक्ती म्हणजे नि:श्रेयस होय. मुक्तीचा लाभ केवळ शिवज्ञानामुळेच होईल, अन्य कोणत्याही ज्ञानामुळे नव्हे. शिवाद्वैतज्ञानाशिवाय पुरुषाजवळ राग-द्वेष नसतो. रागद्वेष करण्यासाठी भेदबुद्धी हवी, अनुकूल-प्रतिकूल ज्ञान हवे. आधी भेदबुद्धी मग अनुकूल-प्रतिकूल ज्ञान, मग अनुकूल व्यक्तीविषयी राग आणि प्रतिकूल व्यक्तीविषयी द्वेष उत्पन्न होईल. भेदज्ञान रागद्वेषाचे कारण होय. भेदज्ञानाला अज्ञान कारण होय. शिवाद्वैत भक्तींने ज्याचे अज्ञान नष्ट झाले आहे, त्याच्याजवळ भेदज्ञान नसते. अज्ञान नाही म्हणून भेदज्ञान नाही, भेदज्ञान नाही म्हणून अनुकूल-प्रतिकूल ज्ञान नाही. अनुकूल-प्रतिकूल ज्ञान नाही म्हणून रागद्वेष नाही आणि रागद्वेष नाहीत म्हणून जन्म-मरण नाही. शिवाद्वैतज्ञानामुळे सारे भेद मावळून जातात. हे ज्ञान नि:श्रेयस प्राप्त करुन देणार आहे. म्हणून शिवाद्वैत ज्ञान प्राप्त करण्यासारखे आहे.

परिपूर्णं महाज्ञानं परतत्त्वप्रकाशकम् ।
अवलम्ब्य प्रवृत्तो यो ज्ञानाचार: स उच्यते ।। १६.७९।।

परतत्व हे सर्वश्रेष्ठ तत्त्व होय. वीरशैवसिद्धांतात सर्व प्रपंचाला तत्वात्मक मानले आहे. पृथ्वीपासून ते शिवापर्यंत छत्तीस तत्त्वे सांगितली आहेत. छत्तीस तत्वांमधील उत्कृष्ट तत्व शिवतत्व आहे.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## समाजात विज्ञान वृत्ती भिनवू या...

२८ फेब्रुवारी हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' संपूर्ण भारतात साजरा केला जातो. १९२८ साली याच दिवशी भारताचे थोर भौतिकशास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रामन यांनी प्रकाशशास्त्रावरील आपला जगप्रसिद्ध सिद्धांत जो रामन परिणाम' म्हणून ओळखला जातो, जाहीर केला आणि पुढे १९३० मध्ये त्यांना या शोधाबद्दल विज्ञानाचा नोबेल पुरस्कार मिळाला. विज्ञानदिनाच्या निमित्ताने देशभर विज्ञानाचे वातावरण निर्माण करून लोकांना विज्ञानाचे महत्त्व आणि फायदे समजावणे, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे विषयी जागृती करणे, तरुण विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित व प्रेरित करणेविषयी विविध उपक्रम राबवले जातात. भारत हा योग व अध्यात्म यांचा देश आहे, असा समज परदेशातच नव्हे तर आपल्या देशातही पसरलेला आढळतो. तथापि, हजारो वर्षांची विज्ञान आणि तंत्रज्ञानाची परंपरा लाभलेल्या आपल्या देशाने गणितशास्त्र, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यक शास्त्र आदी क्षेत्रात तेजस्वी कामगिरी केलेली आहे. अणू ऊर्जा कार्यक्रम, अवकाश संशोधन, कृषी विज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, संरक्षण, औद्योगिक उत्पादन अशा अनेक क्षेत्रांत गेल्या काही दशकांमध्ये भारतीयांनी लक्षणीय कामगिरी करीत मुसंडी मारली आहे. सध्याचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे असून भारतानेही तंत्रज्ञानात मोठी क्रांती केली असून आज देशात सर्वांच्या हातात स्मार्ट फोन आला आहे, तर इंटरनेटचा वापर करणाऱ्या भारतीयांची संख्या पन्नास कोटीच्या वर पोहचली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवी जीवन सुखी झाले असले तरी अजूनही समाजांमध्ये अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि भानामती यांचे प्रमाण म्हणावे तसे कमी झालेले दिसत नाही. आजही समाजात विज्ञान आणि वैज्ञानिकांविषयी अनेक गैरसमज आहेत. तथापि विज्ञानामुळेच जीवन सुखकर होत असल्याचे रोजच्या घडामोडी तून आपल्याला पहावयास मिळते. दैनंदिन जीवनामध्ये आपण वापरत असलेल्या कितीतरी वस्तू विज्ञानातील सिद्धांत, तत्त्वे आणि नियमांवर आधारित असल्याचे दिसून येते. विज्ञान कार्यकारण भाव मानते. परिणामा'च्या निमित्ताने विज्ञान दिन साजरा केला जातो, तो परिणाम रामन यांना सन १९२४ च्या कॅनडामधील जागतिक परिषदेस जाताना बोटीच्या प्रवासात समुद्राचे आणि आकाशाचे निरीक्षण करूनच सुचला. भविष्यात भारत हा जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असणारा देश ठरणार असल्याने वैज्ञानिक दृष्टिकोन तरुण पिढींमध्ये रुजविण्याची, त्यांच्या कुतूहल बुद्धीला प्रोत्साहन देण्याची आज आवश्यकता आहे. या वर्षाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भारतात वैज्ञानिक क्रांती करण्याचे आपण ठरवू या.

**- प्रा. विजय कोष्टी, सांगली.**


# श्रमिक महिलांचे अर्थव्यवस्थेतील स्थान

कोणत्याही देशाच्या विकासाचे प्रमाण हे त्यातल्या महिला कामगारांच्या सहभागावरून ठरते. भारतात महिलांनी गेल्या काही दशकांमध्ये अनेक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे, परंतु कामगार सहभाग तसेच समाजात त्यांची असणारी स्थिती अजूनही फारशी चांगली नाही. आपल्या देशात स्त्रीकडे केवळ घर सांभाळणारी सदस्य म्हणून पाहिले जाते, तर पुरुषाकडे घराचा प्रमुख आणि कमावता सदस्य म्हणून पाहिले जाते. म्हणजेच प्राचीन काळापासून चालत आलेली लिंगभेदाची परंपरा अजूनही अबाधित आहे आणि ती पूर्णपणे संपेल, असे वाटतही नाही. गेल्या दोन दशकांत जागतिक स्तरावर महिलांच्या शिक्षणाच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली असली तरी प्रजनन दरात मात्र घट झाली आहे.

या दोन्ही कारणांमुळे जगभरातील श्रमशक्तींमध्ये महिलांच्या सहभागामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. तथापि, भारताच्या बाबतीत परिस्थिती तितकी सामान्य आणि स्पष्ट नाही. भारताची सामाजिक रचना सुरुवातीपासूनच वेगळी आहे, ज्यामध्ये महिलांना घराचा उंबरठा ओलांडण्यासाठीही संघर्ष करावा लागतो. तरीही, नियतकालिक श्रम बल सर्वेक्षण २०१८-१९ नुसार, १५ वर्षांवरील वयोगटातील महिला श्रमशक्ती सहभाग दर (एलएफपीआर) ग्रामीण भागात सुमारे २६.४ टक्के आणि शहरी भागात २०.४ टक्के आहे. लिंग समानतेच्या दिशेने सरकारने गेल्या काही वर्षांत केलेल्या प्रयत्नांवर कोरोना महामारीचा मोठा परिणाम झाला आहे, त्यामुळे महिला आणि मुलींना भेडसावणाऱ्या असमानतेची खोल दरी आणखी रुंदावत चालली आहे. जागतिक स्तरावर, जवळपास निम्म्या महिला काम करतात. अलिकडे अनेक देशांमध्ये महिला श्रमशक्ती वाढल्यामुळे रोजगारातील महिला आणि पुरुषांमधील अंतर कमी झाले आहे. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनने जारी केलेल्या 'वर्ल्ड एम्प्लॉयमेंट अँड सोशल आउटलुक-ट्रेंड्स २०२०' या अहवालात ही बाब समोर आली आहे.

अहवालानुसार भारताव्यतिरिक्त, पाकिस्तान, बांगलादेश आणि उत्तर आफ्रिकेतील देश-मोरोक्को, इजिप्त आणि ट्युनिशियामध्येही हीच परिस्थिती आहे.

सामाजिक स्तरावर महिलांच्या खराब स्थितीमुळे, त्यांची रोजगाराची लोकसंख्या देखील सर्वात वाईट श्रेणीत आहे, जी उघडपणे लैंगिक असमानता दर्शवते. तरीही, भारताच्या बाजार अर्थव्यवस्थेत महिलांच्या सहभागाचा ट्रेंड यांच्या विपरीत दिशेने जात आहे. वाढलेला प्रजनन दर, महिलांच्या शैक्षणिक प्राप्तीमध्ये प्रचंड वाढ आणि गेल्या दोन दशकांमध्ये भरीव आर्थिक वाढ असूनही, भारतीय महिलांचा कामाचा वाटा कालांतराने घसरला आहे. रोजगाराच्या क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता प्राप्त करण्यासाठी भारताने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. या प्रयत्नांमध्ये आर्थिक संधी, कायदेशीर संरक्षण आणि भौतिक सुरक्षा या घटकांचा समावेश असेल. विशेष म्हणजे, महिला आधीच आपल्या अर्थव्यवस्थेचा एक भाग आहेत आणि अनौपचारिक क्षेत्रात कमी पगाराच्या नोकऱ्या करत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्यामध्ये योग्य कौशल्य निर्माण करण्याला प्राधान्य देण्याची गरज आहे.



भारत सरकार कौशल्य प्रशिक्षणावर भर देत आहे. शहराला आवश्यक असलेल्या काही सेवा देण्यासाठी महिला योग्य आहेत. मात्र, महिलांना कामाच्या पारंपरिक क्षेत्रापुरते मर्यादित ठेवण्याचे काही कारण नाही. त्यांच्याकडे पारंपारिक अडथळे पार करण्याची नैसर्गिक क्षमता आहे आणि जर ते योग्य कौशल्यांनी सुसज्ज असतील तर नवीन रोजगारामध्ये स्वतःला चांगले सिद्ध करू शकतात. राष्ट्रीय अर्थव्यवस्था शहरांवर आधारित होत असल्याने शहरांना केंद्रस्थानी ठेवून महिलांसाठी रोजगाराच्या संधींही निर्माण कराव्या लागतील. परंतु जर सरकारचे आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात महिलांचा समावेश करण्याचे उद्दिष्ट असेल, तर त्यांनी आपल्या शहरी सेवांमधील विद्यमान तफावत दूर करणे आवश्यक आहे. महिलांनाही ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडावे लागेल.

ज्या महिला शहरांशी जोडलेल्या नाहीत, त्यांनी त्यांच्या घराजवळ आणि त्यांच्या आवडीच्या कालावधीत काम करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. यासाठी, महात्मा गांधी रोजगार हमी कायद्यांतर्गत, त्यांना पूर्वनिश्चित वेतन दराने १०० दिवसांचा रोजगार देण्याची तरतूद आहे. पण २०१८ मधील सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की अशा कामांमध्ये महिलांचा सहभाग कमी होत आहे. हे ग्रामीण समाजात अधिक स्पष्टपणे दिसून येते. कौटुंबिक आकारमानात घट आणि ग्रामीण भागातील पुरुषांकडून स्थलांतरित होण्याच्या दबावामुळे महिलांचे बिनपगारी म्हणजे घरातले काम वाढले आहे. ओईसीडीच्या अहवालानुसार, भारतीय महिला दररोज सरासरी ३५२ मिनिटे घरातील कामांमध्ये वेळ घालवतात. पुरुष विनामोबदला कामात घालवलेल्या वेळेपेक्षा हे प्रमाण ५७७ टक्के जास्त आहे. ही पुरवठा समस्या आहे ज्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्याचा फटका गरिबांना जास्त बसत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे.

**- मच्छिंद्र ऐनापुरे, जत, जि. सांगली.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.




## आ.कल्याणशेट्टी यांना विविध कामांचे निवेदन

**सोलापूर** : वरळेगाव (ता.द.सोलापूर) येथील लकाईदेवी पॅनल व वरळेगाव ग्रामस्थांच्या वतीने विकास निधीच्या मागणीचे निवेदन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना देण्यात आले. वरळेगांव - वडजी रस्ता ते लकाई मंदिर, ३० लाख रु., वरळेगाव - बोरामणी रस्ता ते मळगे वस्ती, ३०लाख रु., वरळेगाव बस स्टॉप ते ग्रामपंचायत कार्यालय, १५ लाख रु.लकाई मंदिर सभा मंडप बांधणे, ७ लाख, झुंबर भोसले घर ते राजू काटकर घर गल्लीत गटार व सिमेंट रस्ता करणे, १० लाख रु.आदी रस्ते डांबरीकर व सभा मंडप कामाचे निवेदन सिताराम तांडा बक्षीहिपरगा येथे देण्यात आले. यावेळी मा. सरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्य श्रीमंत हक्के, भीमा कवडे, आरपीआयचे द. तालुकाध्यक्ष किशोर चौधरी, रासपचे जिल्हा उपाध्यक्ष यशवंत सोडगे, तालुका उपाध्यक्ष तानाजी हक्के, नवनाथ मळगे, लक्ष्मण हक्के, शिवाजी कवडे, दौलत मळगे, केदार करके, भीमा मोटे, महावीर मळगे, सोमा कवडे, नागु कवडे, सुरज नवले, शहाजी हक्के, तुळशीराम माने, विनायक पवार, लक्ष्मण तुकाराम हक्के, सुरज जाधव, प्रशांत मळगे आदींच्या उपस्थितीत होते. आ. कल्याणशेट्टी यांनी लवकरात लवकर निधी मंजूर करून देण्याचे आश्वासन दिले.



## पुण्यात मराठी नायछटांचे ईबुकचे प्रकाशन

**सोलापूर** : मराठी दिनाच्या पूर्वसंध्येला मराठी नायछटांचे किंडलवर ईबुक प्रकाशित आले. मराठी नाट्यछटा भाग २ या पुसतकात वय १८ ते पुढच्या वयोगटासाठीच्या नाट्यछटा यावर उपलब्ध आहेत. डॉ. मीरा शेंडगे, शिल्पा कुलकर्णी, संध्या कुलकर्णी 'राजश्री काळे आदिंच्या लिखित नाटय छटांचा यात सामावेश आहे. देवेंद्र भिडे यांच्या संकल्पनेतून गप्पा गोष्टी गाणी या समूहाने या प्रकाशित केल्या आहेत. २६ फेब्रु रोजी सुदर्शन रंगभूमीवर पुणे येथे सर्व नाट्यछटा लेखिकेच्या हस्ते याचे प्रकाशन झाले. याच पुस्तकाती यावेळी १२ नाट्यछटांचे सादरीकरणही यावेळी झाले. डॉ. मीरा शेंडगे यांचे मनोगत व देवेंद्र भिडे यांनी संकल्पना स्पष्ट केली. नाट्यछटा हा वाङमय प्रकार पुन्हा प्रचलित व्हावा हाय या मागचा मूळ उद्देश आहे असे त्यांनी सांगितले.



## सिंहगड महाविद्यायात इलेक्ट्रिक व्हेईकल्सवर कार्यशाळा

**सोलापूर** : केंगाव येथील एन.बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने इलेक्ट्रिक व्हेईकल्स या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन प्रिसिजनचे कार्यकारी संचालक करण शहा सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ रवींद्र व्यवहारे, जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागप्रमुख प्रा. विजय बिरादार, कार्यशाळेचे समन्वयक प्रा. अनिल कोटमाळे,प्रा. सचिन चव्हाण आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. रवींद्र व्यवहारे यांनी केले व सूत्रसंचालन प्रा. कौस्तुभ मंगरुळकर व प्रा. हेमंत लगदिवे यांनी केले व प्रा. सचिन चव्हाण यांनी उपस्थित आभार मानले.



## कुस्ती निवेदक युवराज केचे यांना निमगाव येथे छत्रपती पुरस्कार प्रदान

**निमगाव** : बहुजन प्रतिपालक ,कुळवाडी भूषण छ. शिवाजी महाराज यांच्या ३९३ व्या जयंतीनिमित्त निमगाव ता माळशिरस येथे राजे प्रतिष्ठान व पवार तालीम चे वस्ताद गोरख पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि २६ फेब्रुवारी रोजी निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित करण्यात आले होते या मैदानात गारा अकोले ता माढा येथील महाराष्ट्रभर ख्याती असलेले सुप्रसिद्ध कुस्ती समालोचक युवराज केचे यांना चांदीची गदा, शाल ,फेटा व पुष्पहार देऊन छत्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी पवार तालमीचे वस्ताद गोरख पवार, महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, विजय पवार ,किसन पवार, दादा पवार, मातोश्री इंडस्ट्रीजचे नागनाथ मगर, युवा सेना विस्तारक उत्तम अहिवळे ,युवा सेनेचे राज्यसचिव स्वप्निल वाघमारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अंबादास ओरसे, युवा सेनेचे माळशिरस तालुका अध्यक्ष सुभाष काकडे, राष्ट्रवादीचे नेते अशोक गायकवाड, तुकाराम साळुंखे, राहुल ढेरे, निमगाव ग्रामपंचायतीचे सदस्य किरण पाटील, प्रताप मगर, सुनील मगर ,सत्यवान बोडरे, आबासाहेब सावंत यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. युवराज केचे यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर जवळपास एक हजारांपेक्षा जास्त मैदानावर कुस्ती समालोचक म्हणून काम केले असून मुंबई महापौर केसरी पुणे महापौर केसरी मीरा-भाईंदर महापूर केसरी परभणी नागपूर आदी ठिकाणी त्यांनी उत्तम कुस्ती निवेदक म्हणून काम पाहिलेले आहे ते स्वतः एक पहिलवान असून वयाच्या विसाव्या वर्षापासून कुस्ती समालोचक म्हणून ते काम पाहत आहेत पदवीधर असलेले युवराज केचे यांनी आपले चुलते प्रल्हाद केचे यांच्याकडून कुस्तीची प्रेरणा घेऊन कुस्ती समालोचक म्हणून काम केलेली आहे या कामाची दखल घेऊन त्यांना प्रथमच राजे प्रतिष्ठान व पवार तालीम यांच्या वतीने छत्रपती पुरस्कार देण्यात आलेला आहे.

# जिल्हा अंतर्गत जि.प. शिक्षकांच्या बदल्यांना झाली सुरुवात

## ▶▶ शिक्षण विभागाची माहिती
## ▶▶ नियुक्तीसाठी पाहावे लागेल मे महिन्यांची वाट

**सुराज्य/सोलापूर**

जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या ऑनलाईन पध्दतीने सुरू झाल्या असून, त्यांना बदलीचे नियुक्तीसाठी मे महिन्यांची वाट पाहावे लागणार आहे. सन २०२१-२२ मध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षकांनी बदली पोर्टलवर माहिती भरली होती. त्या शिक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. यामध्ये मुख्याध्यापक, उप शिक्षक, विषय शिक्षक अशा विविध प्रकारच्या शिक्षकांचा समावेश आहे.

संवर्ग- १ मधील गंभीर आजार असलेले, ५३ वर्षाच्या पुढील शिक्षक, दिव्यांग शिक्षक अशा १८१ शिक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. संवर्ग - २ मध्ये पती पत्नी एकत्रिकरण बदल्या मध्ये ९८ शिक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत.

संवर्ग - ३ मध्ये डोंगराळ भाग, अवघड क्षेत्र असलेल्या शिक्षकांच्या बदल्या होत असतात. मात्र आपल्याकडे अवघड क्षेत्र नसल्याने या संवर्गातील बदल्या करण्यात आल्या नाहीत. तर संवर्ग - ४ मध्ये ७३८ शिक्षकांच्या बदल्या ऑनलाईन झाल्या असून, यामध्ये सर्वसाधारण शिक्षकांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदेतील १ हजार १७ प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या ऑनलाईन बदली पोर्टल झाले असून, यामध्ये बदलीस पात्र असलेल्या शिक्षकांनी बदलीसाठी ऑनलाईन अर्ज केला होता. तसेच आपल्या ज्या ठिकाणी बदली पाहिजे अशा ठिकाणची प्रातिनिधी स्वरुपात नावे ऑनलाईन भरली होती. ज्या ठिकाणी शिक्षकांच्या जागा रिक्त होत्या त्या ठिकाणीच शिक्षकाची बदली झाली आहे.

### नियुक्ती पत्र लवकर देण्यात येईल

जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदल्या झाल्या आहेत. यामध्ये मुख्याध्यापक, विषय शिक्षक, उप शिक्षक, दिव्यांग शिक्षक, सर्वसाधारण शिक्षकांचा समावेश आहे. बदल्या झालेल्या शिक्षकांना अजून तरी नियुक्ती पत्र देण्यात आले नाही. मात्र त्यांना लवकरच नियुक्तीचे पत्र देण्यात येणार आहे. तसेच ज्या शिक्षकांना पुढील वर्षी बदली पाहिजे. त्या शिक्षकांनी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु झाल्यावर अर्ज करावा.

**-संजय जावीर, शिक्षणाधिकारी, प्राथमिक विभाग, जि.प. सोलापूर**

## सामूहिक बलात्कार; विष्णू बरगंडेला न्यायालयीन कोठडी

**सुराज्य/सोलापूर**



सामुहिक बलात्कार प्रकरणी पोलीस कोठडीत असलेल्या विष्णू गुलाब उर्फ चंद्रकांत बरगंडे (वय४७, धंदा. नोकरी, रा.शिवाई निवास औसे वस्ती,आमराई सोलापूर) याला न्यायालयीन कोठडीत पाठविण्याचा आदेश न्यायालयाने सोमवारी दिला. तपास अधिकारी ग्रामिण पो. अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी त्याला अटक करून ५ दिवसाची पोलिस कोठडी घेतली होती.

३१ आक्टोबर२०२१ रोजी विष्णू बरगंडे आणि मुख्य आरोपी गणेश कैलास नरळे यांनी संगणमत करून फिर्यादी पिडीतेस ठार मारण्याची तसेच बदनामी करण्याची धमकी देऊन पुणे येथे घेऊन गेले होते. आणि तिच्यावर बळजबरीने सामूहिक अत्याचार केला होता. अशा आशयाची फिर्याद पिडीतेने पोलीसात दिली होती. या प्रकरणात फौजदार चावडीच्या पोलिसांनी गणेश कैलास नरळे आणि विष्णू बरगंडे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात पोलिसांनी गणेश कैलास नरळे यास अटक केली. त्यानंतर फौजदार चावडीच्या पोलिसांनी गणेश कैलास नरळे याच्या विरुद्ध भादवि कलम ४१७ अंतर्गत दोषारोपपत्र पाठवून आरोपी विष्णू बरगंडे या आरोपीला गुन्ह्यातून वगळण्याचा अहवाल न्यायालयात दाखल केला होता. त्यानंतर फिर्यादीने सदर अहवालाविरुद्ध या प्रकरणाचा निष्पक्षपाती तपास करावा म्हणून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पोलीस महासंचालकांनी सदरचा गुन्हा सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्याकडे तपास करीता वर्ग केला होता. त्याप्रमाणे सरदेशपांडे यांनी आरोपी विष्णू बरगंडे याला अटक करून ५ दिवसाची कोठडी घेतली होती. मुदत संपल्याने आज आरोपीला न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते.

या प्रकरणात मूळ फिर्यादीतर्फे ॲड.प्रशांत नवगिरे, ॲड.श्रीपाद देशक तर सरकारतर्फे ॲड. असावरी जोशी तर आरोपी तर्फे ॲड.महिंद्रकर यांनी काम पाहिले.

## बैल मारल्याने वृद्ध इसमाचा मृत्यू

**सोलापूर** : बाजार करून पायी घराकडे जात असताना पाठीमागून मोकाट बैलाने धडक दिल्याने ७० वर्षीय वृद्ध इसम गंभीर जखमी होऊन मरण पावले. ही घटना मोहोळ येथील आठवडा बाजारात रविवारी दुपारच्या सुमारास घडली. सातप्पा पांडुरंग कांबळे (वय ७० रा. आठवडा बाजार मोहोळ) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. काल दुपारी ४ वाजेच्या सुमारास ते बाजार करून पायी घराकडे निघाले होते. त्यावेळी पाठीमागून मोकाट बैलाने धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना मोहोळ येथे खाजगी उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते सोमवारी सकाळी मयत झाले. मयत सातप्पा यांच्या पश्चात पत्नी, २ मुले आणि २ मुली असा परिवार आहे. या घटनेची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली. हवालदार चमके पुढील तपास करीत आहेत.

## गुरव समाज नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

**सुराज्य/सोलापूर**



गुरव समाज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली. पतसंस्थेच्या स्थापनेपासून बिनविरोध निवडणूक होत असलेली गुरव समाजातील ही पतसंस्था गेल्या ३२ वर्षापासून कार्यरत आहे.

संस्थेचे संस्थापक मल्लिकार्जुन गुरव यांच्यावर असून त्यांच्यामार्फत भरण्यात आलेले फॉर्म दहा फेब्रुवारी रोजी एक संचालक बिनविरोध घोषित करण्यात आले होते. निवडणुकीचे अर्ज माघार घेण्याची तारीख २७ फेब्रुवारी शेवटची होती या शेवटच्या दिवशी वीस लोकांनी आपले फॉर्म मागे घेतल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली.

**निवडणुकीतील विजयी उमेदवार** : मल्लिकार्जुन गुरव, चंद्रकांत गुरव, काशिनाथ मेलगिरी, प्रकाश मोकाशी, ॲड. सागर पाटील, किरण डांगे, शितल पाथरकर, महादेवी फुलारी, महादेव बिराजदार, रंगनाथ गुरव, श्रीमंत वनखडे, सिंगडगाव असे सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले. निवडणूक बिनविरोध निवडणूक अधिकारी वटे यांचे आभार संस्थेचे संस्थापक मल्लिकार्जुन गुरव यांनी व्यक्त केले. निवडणूक बिनविरोध होण्यासाठी माजी नगरसेवक माननीय सुभाष डांगे व शरद सूतगिरणीचे माजी संचालक किशोर पाटील, सुनील पाटील, शशिकांत जिड्डीमनी, विनय ढेपे, आदिनाथ पुजारी, धनंजय तीर्थकर, दशरथ गुरव यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

# मराठी भाषा गौरव दिनी मराठीचा जागर





### वसुंधरा महाविद्यालय

**सोलापूर** : कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस वसुंधरा कला महाविद्यालयामध्ये मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रा.डॉ. जवाहर मोरे यांचे मराठी भाषा व विनोदाचे स्वरूप या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. मोरे यांनी मराठी भाषेचे महत्व विशद करून प्रत्येक भाषेचे संवर्धन करणे आवश्यक आहे.मराठी भाषेत रोजगाराच्या खूप संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी आपली मातृभाषा चांगल्या प्रकारे आत्मसात करणे गरजेचे आहे. मत व्यक्त केले. त्याचबरोबर मराठी भाषेतील विनोदाचे स्वरूप विविध प्रसंगातून आपल्या खुमासदार शैलीतून त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या व कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. मीना गायकवाड यांनी 'मराठी भाषा ही समृद्ध असून मराठी भाषेतही रोजगाराच्या खूप संधी आहेत त्या संधी विद्यार्थ्यांनी पाहणे आवश्यक आहे.' असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. तानाजी देशमुख यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय डॉ. सुहास उघडे यांनी करून दिला. आभार कु. स्नेहल जाधव व सूत्रसंचालन कु. प्रज्ञा गाडवे यांनी केले.कार्यक्रमास सर्व प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. यानिमित्ताने महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

### एसव्हीसीएस हायस्कूल

महाराष्ट्र ही पराक्रमी योध्याची, संतांची व थोर साहित्यिकांची भूमी आहे. मराठी भाषेमुळे महाराष्ट्राला वैभव प्राप्त झाले आहे. मराठी भाषेला महाराष्ट्रातील संत आणि साहित्यिकांनी समृध्द केले आहे. साहित्यिकांनी रचलेल्या विपुल साहित्य रचनेमुळे मराठी भाषा ही मराठी माणसाची व महाराष्ट्राची आन बाण व शान बनली आहे असे गौरव उद्गगार एसव्हीसीएस हायस्कूल एमआयडीसीचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांनी काढले. प्रशालेतील मराठी विषय शिक्षकांचा प्रशालेच्या वतीने शाल व गुलाब पुष्प देऊन संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. मराठी विभाग प्रमुख व्हनकडे सर कुसुमाग्रज यांची कणा ही कविता सादर केले.तद्नंतर मराठी भित्तीपत्रकाचे आनावरण करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक गिरमल बुगडे ,पर्यवेक्षक विलास म्हमाणे व प्रशालेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुस्कान नदाफ हिने तर आभार चैतन्या अप्पम यांनी मानले.

### मराठी भाषेचा अभिमान बाळगा : डॉ. शिवाजी शिंदे

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व हुतात्मा वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे जेष्ठ कवी कुसुमाग्रज यांची जयंती मराठी भाषा गौरव दिन व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करून साजरा करण्यात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष रामकृष्ण पुढाले नायब तहसिलदार सोलापूर तर व्याख्याते डॉ. शिवाजी शिंदे (सहाय्यक कुलसचिव तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर) हे लाभले होते.

मूल जन्माला आल्यापासून भाषा शिकत असते, कुटूंब हे त्याचे भाषा शिकण्याचे पहिले व्यासपीठ असते, तर शाळा महाविद्यालयपासून त्यांची भाषा समृध्द होत जाते. प्रत्येक व्यक्तीने मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहीजे. पण त्याच बरोबर इतर भाषेचा दुराभिमान करू नये असे विचार डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले. प्रत्येक व्यक्तीने एखादा मराठी सिनेमा किंवा नाटक पाहीले पाहीजे, दैनंदिन व्यवहार मराठीतून केले पाहीजेत,



बाजारपेठेतील फलक मराठीतून असले पाहिजेत, दैनदिन जीवनातील पत्रव्यवहार हा मराठीतून केला पाहिजे, भिलार या पुस्तकाच्या गावाला भेट दिली पाहिजे, जोंधळे आजींने चालू केलेल्या पुस्तकाच्या हॉटेल सारखे प्रयत्न इतरत्र झाले पाहिजेत एखादया कार्यक्रमास किंवा वाढदिवसा दिवशी पुस्तकांची भेट दिली पाहिजे अशा प्रयत्नातून मराठी भाषेचा प्रचार व प्रसार केला पाहिजे असेही यावेळी ते म्हणाले.

याप्रसंगी जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक केले तर कुंडलिक मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कवि कुसुमाग्रज व ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वृषाली हजारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार ग्रंथालय निरिक्षक प्रमोद पाटील यांनी मानले. याप्रसंगी धोंडिराम जेवूरकर, सिध्दाराम हलकुडे, आरिफ रंगरेज,अनसर शेख, सिध्दबा बंडगर, सारिका मोरे, गणेश फंड, दत्ता मोरे, कट्टीमनी, सिध्दाराम बेडगनुर, राजश्री हक्के, नरसिंह मिसालालू, सारीका माडीकर, अरींहंत रत्नपारखे, प्रथमेश बनसोडे, अमित गायकवाड, रोहित राम, कृष्णा शेट्टी, बिरुराज फुलारी, सुरेश पाटोळे यांच्यासह शहरातील ग्रंथालय प्रतिनिधी, वाचक स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी इत्यादी उपस्थित होते.

### शमा उर्दू प्राथमिक शाळा

शमा शिक्षण प्रसारक मंडळ व उर्दू मराठी साहित्य सांस्कृतिक सेवा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने शमा उर्दू प्राथमिक शाळेत मराठी राज भाषा गौरव दिन मोठ्या उत्सहाने अ.भा. मुस्लीम मराठी साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष व प्राचार्य डॉ.इ.जा. तांबोळी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

यावेळी शमा शाळेत पांचवी ते सातवी पर्यतच्या विद्यार्थ्या साठी मराठी सुदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली पंच म्हणून अ .कुदूस यानी काम पाहिले व मराठीचे ज्येषठ साहित्यिक कवी डॉ. ताबोळी यांचा विशषे सत्कार केले. मराठी सुंदर हस्ताक्षर, या स्पर्धेत प्रथम क्रमांक मोमीन जोया महिबूब द्वितीय क्रमाक जैनब परवेज शेख तृतीय क्रमांक अलीना अल्ताफ तांबोळी यांनी मिळविले. अ कुदूस नल्लामंदू यांनी स्वागत केले, शाहीन सदफ यांनी सुत्र संचलन केले तर जुबेदा सैदखा नी जाभार मानले.

### श्रीनाथ हायस्कुलमध्ये कविसंमेलन

जीवन ज्योती क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीनाथ हायस्कूल, शांतीनगर, सोलापूर येथे कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या जयंतीदिनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कवी देवेंद औटी यांच्या अध्यक्षतेखाली कवींचे संमेलन पार पडले. यावेळी कवी वसिष्ठ सोनकांबळे, सुराज्यचे वरिष्ठ उपसंपादक विजय गायकवाड, जैन गुरुकुल शाळेचे निवृत्त शिक्षक विश्वनाथ कल्याणशेट्टी उपस्थित होते. प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक सातलिंग शटगार यांनी प्रास्ताविकेतून प्रशालेच्या विविध उपक्रमांचा उल्लेख करून प्रशालेच्या प्रगतीची माहिती दिली.

यावेळी निमंत्रित कविंनी आपल्या विविध विषयांवरच्या रचना सादर करून विद्यार्थ्यांची दाद घेतली. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये मराठी भाषा संवर्धन सप्ताहाचे दि.२० ते २७ या कालावधीमध्ये आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने शाळेमध्ये सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्य गायन स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, भित्तीचित्र स्पर्धा, समूह गायन स्पर्धा व ग्रंथ प्रदर्शन अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य, गुलाब पुष्प देवून प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्मिताराणी चिवटे, संतोष बिराजदार, गिरीष शिंदे, अशोक विजापुरे आणि मल्लिकार्जून कोळी यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पवार यांनी तर आभार बाबा बनसोडे यांनी मानले.

CMYK



## शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये साजरा झाला 'मराठी राजभाषा दिन'

**अकलूज :** छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाने पावन झालेल्या, संतांच्या शिकवणींने प्रेरित झालेल्या आणि कुसुमाग्रजांच्या साहित्याने समृद्ध झालेल्या महाराष्ट्राच्या मराठमोळ्या मातीत जन्मलेल्या सर्व मराठी मावळ्यांना शुभेच्छा देऊन शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेतील मराठी विषय शिक्षिका शिल्पा जाधव यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये काही विद्यार्थ्यांनी भाषणे केली तर काही विद्यार्थ्यांनी मराठी कविता, चारोळ्या सादर केल्या. तर प्रशालेतील शिक्षक गणेश शेवकर आणि शिक्षिका सुवर्णा निंबाळकर यांनी मराठी गीत सादर केले. उच्चशिक्षित होऊन हिंदी, इंग्रजी सारख्या भाषा अवगत करून, ग्लोबल होऊन मराठी माणूस आपल्या मातृभाषेला विसरत चालला आहे. पण ती टिकावी- तिची किंमत वाढावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. मराठी भाषा वाचवण्यासाठी मराठी भाषेचे संवर्धन करून ती टिकवली पाहिजे. अशाच आशयाने कार्यक्रमाचा शेवट अध्यक्षीय भाषणाने झाला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सहावीतील चि. सोहम प्रशांत जाधव आणि चि.हर्ष अमित ढाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रशालेतील शिक्षिका सुवर्णा निंबाळकर यांनी केले.

## कै.पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलनात मराठी राजभाषा गौरव दिन

**अकलूज :** महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय ,मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय,गिरीजामाता मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, नालंदा विद्यार्थी वसतिगृह यांच्या वतीने मराठी भाषा दिनाच्या पूर्वसंध्येला तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामतीचे उपप्राचार्य डॉ.सीमा गोसावी यांचे ऑनलाइन व्याख्यान घेण्यात आले. दुस-या दिवशी दि २७ रोजी मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांच्या शुभहस्ते ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कुमारी मयुरी हळगोदे, शिक्षिका कल्पना स्वामी व सांस्कृतिक विभाग प्रमुख खंडेराव घाटगे यांची मराठीची थोरवी या विषयावर भाषणे झाली. याप्रसंगी पर्यवेक्षक मोतीलाल चव्हाण, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक जयप्रकाश गुरव, मनिषा शिंदे उपस्थित होते.



## रमापती जयंती उत्सव मंडळच्या वतीने नूतन पदाधिकाऱ्यांची निवड

**अक्कलकोट :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्त रमापती जयंती उत्सव मंडळच्या वतीने २०२३-२४ या वर्षाच्या नुतन पदाधिकारींचे निवड करण्यात आली. पदाधिकारी पुढील प्रमाणे अध्यक्ष- ऋषी लोखंडे, उपाध्यक्ष- सुयश काबंळे सुरज कांबळे,अतिश आहेरकर, राजेश लोखंडे, अजय सोनवणे, खजिनदार- विनय कांबळे सेक्रेटरी- वैभव कांबळे, सहसेक्रेटरी- शिलरत्न निकंबे कार्याध्यक्ष- सिध्दांत होळेसम्राट उबाळे ऑडिटर- रोहित आहेरकर मिरवणूक प्रमुख- निलेश गायकवाड, सुधिर होळे, दिनेश गायकवाड. सर्व नुतन पदाधिकार्यांचे निवड मंडळातील मधुकर दोड्यानुर, भीमराव होळे, राहुल लोखंडे, दिपक दोड्यानुर, रतन गायकवाड राजेंद्र शिंगे, रणजित लोखंडे, संजय गायकवाड, संदिपान निकंबे, भागवत कांबळे बाळु शेवाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली नुतन पदाधिकार्यांचे निवड करण्यात आली.



## वाटंबरे येथे माणनदी स्वच्छता अभियान

**सांगोला :** भारत सरकार दिल्ली व संत निरंकारी दिल्ली रजिस्टर यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रकल्प अमृत स्वच्छ जल, स्वच्छ मन' या उपक्रमा अंतर्गत सांगोला तालुका वाटंबरे येथे रविवारी माणनदी स्वच्छता अभियान' संपन्न झाले. माण नदी स्वच्छता अभियानाचे उद्घाटन वाटंबरे गावचे सरपंच किरण पवार यांच्या हस्ते झाले यावेळी चिणके गावचे सरपंच नाथा खंडागळे ,सोसायटी चेअरमन नाना बापू पवार, ग्रामपंचायत सदस्य नामदेव पवार, नारायण पवार, निकम सर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आले. संत निरंकारी यांच्या वतीने यावेळी उपस्थित असलेले माण नदी स्वच्छता अभियान समन्वयक मार्गदर्शक वैजनाथ घोंगडे, डॉक्टर अमोल पवार, गावचे सरपंच किरण पवार चिणके गावचे सरपंच नाथा खंडागळे, ग्रामपंचायत सदस्य नामदेव पवार, सोसायटी चेअरमन नाना बापू पवार, जलतज्ञ मधुकर पवार, तालुका नियोजन समिती सदस्य विजय पवार, माजी तंटामुक्ती अध्यक्ष गणपत पवार, ज्येष्ठ समाजसेवक महादेव बापू पवार, माजी ग्रामपंचायत सदस्य सुभाष काका पवार, माजी तंटामुक्ती अध्यक्ष प्रतीक दादा पवार, तंटामुक्ती अध्यक्ष भारत पवार, तंटामुक्ती उपाध्यक्ष पत्रकार दत्तात्रय पवार, हनमंत निकम, नारायण पवार, उमेश गायकवाड, भागवत साळुंखे उपस्थित होते.

## हिराबाई बल्लाळ यांचे निधन



**सोलापूर :** फारेस्ट येथील हिराबाई संभाजी बल्लाळ त्यांचे वयाच्या ९८ व्या वर्षी अल्पशा आजाराने कुमठा नाका येथे निधन झाले असून सोशल वर्कर राजश्री बल्लाळ ह्याच्या काकू होत असून त्याच्या पश्चात चार मुले, तीन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे.

# लक्ष्मी विष्णू मिल मैदानावर जिल्हा कृषी महोत्सव भरणार

● ५ ते ९ मार्च दरम्यान पाच दिवस परिसंवाद,चर्चासत्राचे आयोजन
● जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांची माहिती




सुराज्य/सोलापूर

**सोलापूर जिल्हा कृषी विभागाच्या वतीने लक्ष्मी विष्णू मिल मैदानावर जिल्हा कृषि महोत्सव भरणार आहे. पाच ते नऊ मार्च दरम्यान पाच दिवस असे परिसंवाद, चर्चासत्र, प्रदर्शन असे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. महोत्सव यशस्वी करण्यासाठी प्रत्येक यंत्रणेने योगदान द्यावे, अशा सूचना आयोजन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सोमवारी झालेल्या नियोजनाच्या बैठकीत दिल्या.**

कृषिविषयक तंत्रज्ञानाचा प्रसार, शासकीय योजनांची माहिती देणे, शेतकरी, शास्त्रज्ञ संशोधन, विस्तार प्रक्रिया व विपणन साखळी निर्माण करणे, शेतकरी उत्पादक कंपन्यांची क्षमता बांधणी, शेतकरी ते ग्राहक थेट विक्री शृंखला आदि या महोत्सव आयोजनाचे हेतू आहे.

प्राथमिक बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे, उपविभागीय कृषि अधिकारी जयवंत कवडे, आत्माचे प्रकल्प संचालक मदन मुकणे, जिल्हा परिषद कृषि विकास अधिकारी विवेक कुंभार आदिंसह समितीचे सदस्य, कृषि विज्ञान केंद्राचे संशोधक, महाबीज, जिल्हा अग्रणी बँक, माविम, कृषि विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत विविध समित्यांचे गठन व सदस्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. कृषि तसेच अन्य विभागांतील नाविन्यपूर्ण व महत्त्वाच्या योजना यांच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देऊन प्रदर्शन मांडणीपासून यशस्वी करण्यापर्यंतची प्रक्रिया याबाबतचे नियोजन करण्यात आले. या महोत्सवात कृषि प्रदर्शन, विविध परिसंवाद, चर्चासत्रे, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री सुविधा, विक्रेता खरेदीदार संमेलन यांच्यासह जिल्ह्यातील कृषी व संलग्न क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेले शेतकरी व पीकस्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

## तांदुळवाडी येथे एकाच रात्री ३ घरफोड्या; रोख रकमेसह ६५ हजारांचे दागिने लंपास

सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील तांदुळवाडी येथे एकाच रात्री चोरट्यांनी तीन ठिकाणी घरफोड्या करून रोख रकमेसह ६५ हजारांचे दागिने पळविले. या चोऱ्या रविवारी पहाटेच्या सुमारास घडल्या.या धाडसी प्रकारामुळे ग्रामस्यात घबराटीचे वातावरण पसरले आहे.

यासंदर्भात नितीन सुरेश मुडके (वय ३१, रा. तांदुळवाडी) यांनी सोलापूर तालुका पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. चोरट्याने नितीन मुडके यांच्या बंद घराचे कुलूप तोडून १५ हजार रुपये रोख आणि चार ग्रॅम सोन्याचे दागिने पळविले.तसेच गावातील अनिल बोने यांच्या घरातून १२ हजार रुपये रोख तर सोमनाथ तेली यांच्या घरातील कपाटातून २४ हजार रुपये आणि ५ ग्रॅम सोन्याचे दागिने असा ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास फौजदार बनसोडे करीत आहेत.

## हर्षल बागल यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान

सुराज्य/कुर्डुवाडी

सापटणे येथील सरपंच हनुमंत गिड्डे कला क्रीडा व सांस्कृतिक मंचचा या वर्षीचे विविध पुरस्कार दिले गेले. यामध्ये पत्रकारितेतील धाडसी राजकीय व सामाजिक विश्लेषक म्हणुन सातत्याने लेखन करणारे पत्रकार हर्षल बागल यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्काराने गौरवण्यात आले.

ग्रामिण भागातील विविध विषयांवर हर्षल बागल यांची सडेतोड भूमिका, राजकीय विषयावर लिहताना कारखानदार लॉबींवर अनेकदा प्रहार केलेत. अनेकवेळा हर्षल बागल यांनी विविध शोध बातमीदारीतून लोकांना समाजाला न्याय देण्याचे काम केले. त्याबद्दल हा पुरस्कार दिला जात असल्याचे आयोजकांच्या वतीने सागण्यात आले. यावेळी सरपंच हनुमंत गिड्डे, सुगंधाताई पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक धर्मराज पाटील यांच्यासह अनेक शिवप्रेमींच्या उपस्थितीत हा पुरस्कार दिला गेला. रणजित राऊत यांनी सूत्रसंचालन केले.




### पुरस्कारामुळे जबाबदारी वाढली

सरपंच हनुमंत गिड्डे कला क्रिडा व सांस्कृतिक मंच सापटणे यांचा मानाचा पत्रकारिता क्षेत्रातील पुरस्कार मला दिला गेला याचा आनंद आहे. भविष्यातील पत्रकार म्हणुन जबाबदारी वाढली आहे.

–पत्रकार हर्षल बागल



## रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी हाती घेतला तृतीयपंथीयांमध्ये जन जागृतीचा उपक्रम

सुराज्य/अकलूज

अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी समाजाचा महत्त्वाचा घटक आसलेल्या तृतीयपंथीयांना शिक्षण, व्यवसाय, नोकरी इत्यादी गोष्टींमध्ये प्रगत करण्याच्या हेतूने तृतीयपंथीयांमध्ये जनजागृती कार्यक्रम हाती घेतला आहे.या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी अनेक तृतीयपंथीयपर्यंत जाऊन चर्चा सत्राच्या माध्यमातून जन जागृती करण्याचा व तृतीयपंथीयांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

याच संदर्भात स्वयंसेवकांनी महाराष्ट्रातील पहिले तृतीयपंथी सरपंच ज्ञानेश्वर कांबळे उर्फ माऊली कांबळे (रा.तरंगफळ, ता.माळशिरस) यांना भेटून चर्चा सत्र आयोजित केलं.

अनेक तृतीयपंथीयांना आपल्या सहवासामध्ये ठेवून घडवण्याचं काम ते करत आहेत. स्वयंसेवकांनी तृतीयपंथीयांच्या शिक्षण, नोकरी, विविध सरकारी योजना, व्यवसाय इत्यादी विषयावर त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी समाजात वेगळे न राहता समाजासोबत राहण्याची इच्छा आसल्याच सांगितले, तृतीयपंथीयांना नोकरी आसावी, त्याचा ही उदरनिर्वाहसाठी एखादा व्यवसाय आसवा त्यासाठी सरकारने आर्थिक स्वरूपाची मदत करावी अशी आशा व्यक्त केली. यावेळी अनेक तृतीयपंथी उपस्थित होते. त्यांनी स्वयंसेवकांनी तृतीयपंथीयांसाठी सुरू केलेल्या कार्याच कौतुक केलं तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे आभार मानले. या उपक्रमासाठी स्वयंसेवकांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे, तसेच विभागीय समन्वयक डॉ.चंकेश्वर लोंढे, कार्यक्रम आधिकरी प्रा.दत्तात्रय मगर, डॉ.सविता सातपुते, डॉ.सज्जन पवार, डॉ. चंद्रशेखर ताटे-देशमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.



## नवीन रस्त्यांसाठी कोट्यवधींचा निधी आणला : आ. कल्याणशेट्टी

सुराज्य/अक्कलकोट

मतदारसंघाच्या दृष्टीने दळणवळाकडे गेली काही वर्षे दुर्लक्ष झाले, मात्र आपण आमदार झाल्यापासून ग्रामीण विकासाकरिता महत्त्वाचे असलेल्या रस्त्याबाबत नवीन रस्ता सुधारणा करणे याकरिता कोट्यावधी रुपयांचा निधी आणल्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

ते शनिवारी अक्कलकोट रेल्वे स्टेशन ते कल्लहिप्परगे फाटा रस्ता सुधारणा करण्यासाठी रु.१ कोटी ५१ लाख खर्चाच्या कामांच्या भूमीपुजन कार्यक्रमाप्रसंगी आमदार कल्याणशेट्टी हे बोलत होते.

आमदार कल्याणशेट्टी पुढे बोलताना म्हणाले, अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील शहर, गावे, वाड्या, वस्त्या, तांडे यांच्या विकासाकरिता विविध योजनेच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन घेण्यात आला. यामुळे गेल्या अनेक वर्षापासूनचा विकासाचा अनुशेष भरुन निघण्यास मदत होणार आहे.

यावेळी खासदार डॉ.जयसिध्देश्वर शिवाचार्य महस्वामी, संजय गांधी निराधार योजना समितीचे ता.अध्यक्ष महिबुब मुल्ला, परमेश्वर यादवाड, महेश पाटील, जाफर मुल्ला, श्रीशैल बनसोडे, शंकर पाटील, मल्लू नागशेट्टी, संगमेश्वर पाटील, शरणू बमदे, नितीन चव्हाण, सिध्दू सुरवसे, महंत पाटील, विजय पाटील, तुकाराम राठोड, महादेव बडूरे आदीसह नागरीक उपस्थित होते.

## बोळेगाव येथे तलवारीने हल्ला; एक जखमी

**सोलापूर :** बोळेगाव (ता. तुळजापूर) येथे भावकीतील भांडण सोडविण्यास गेले असता तलवारीने केलेल्या मारहाणीत बालाजी गोविंद रुपनुर (वय ४६, रा.बोळेगाव) हे जखमी झाले. ही घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्यांना नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना प्रकाश बलभीम रुपनुर याने मारहाण केली अशी नोंद पोलिसात झाली आहे.

## वाडेगाव येथे मोटारीच्या धडकेने दुचाकीवरील तरुण ठार

सुराज्य/सोलापूर

बांधकामावरून घराकडे दुचाकीवरून जात असताना मोटारीच्या धडकेने दुचाकी वरील तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात सांगोला येथील वाडेगाव नाक्याजवळ रविवारी दुपारच्या सुमारास घडला.

राहुल ज्ञानेश्वर कोरे (वय २२, रा.लक्ष्मी दहिवडी, ता.मंगळवेढा) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे.



तो सेंट्रींग चे काम करीत होता. काल दुपारी सांगोला येथील काम बघून तो दुचाकीवरून लक्ष्मी दहिवडी येथे निघाला होता. वाडेगाव नाक्याजवळ समोरून मोटर धडकल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला सांगोला येथे प्राथमिक उपचार करून वडिलांनी सोमवारी पहाटे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत राहुल कोरे हा अविवाहित असून तो एकुलता होता. त्याच्या पश्चात आई-वडील आणि दोन बहिणी असा परिवार आहे. या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली. हवालदार स्वामी पुढील तपास करीत आहेत.

# स्पर्धेला सहकाराची जोड मिळते तेव्हा उत्क्रांती होते : डॉ. मोरे

## कवी श्रीकांत मोरे लिखित सहा काव्यसंग्रहाचे पुणे येथे प्रकाशन

सुराज्य/सोलापूर



मानवाच्या उत्क्रांतीमागे स्पर्धा आहे. जगण्यासाठी आणि टिकण्यासाठीसुद्धा स्पर्धा आहे. स्पर्धेला सहकाराची जोड मिळते तेव्हा उत्क्रांती होते. सहकारातून समृद्धी करणारी मंडळीच इथे आहेत. श्रीकांतजींची दृष्टी ही व्यक्तिकेंद्रित नाही तर त्यांची प्रेरणा ही सामाजिक आहे. कवितेतून ते व्यक्त होते. कविता हे जगणे असते. आत्मभानाला सामाजिक भानाची जोड आहे. वर्णनाच्या पुढे जाऊन चिंतनशील विचार बनवते. विचार जिवंत नसतील तर काही साध्य होत नाही. जगण्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे, असे गौरवोद्गार महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी काढले.

कवी श्रीकांत मोरे लिखित मनोरम कविता, मनमुक्त, दुनियादारी, जीवनसरिता, रंगमंच, मन मानेल तसे या सहा काव्यसंग्रहांचा प्रकाशन सोहळा रविवारी सकाळी साडेअकरा वाजता पुणे येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मुख्य कार्यालयातील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. सदानंद मोरे होते.

व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे साखर आयुक्त शेखर गायकवाड, सहकार आयुक्त अनिल कवडे, सारथी'चे कार्यकारी संचालक अशोक काकडे, अपर कामगार आयुक्त शैलेंद्र पोळ, मसाप पुणे कार्यवाह प्रकाश पायगुडे, माजी कामगार उपायुक्त संभाजीराव काकडे, जालन्याच्या कवयित्री संजीवनी तडेगावकर, कवी श्रीकांत मोरे, मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे, मनोरमा साहित्य मंडळीच्या उपाध्यक्षा अस्मिता गायकवाड, संतोष सुरवसे, डॉ. दत्ता घोलप, उज्वला साळुंखे, सुरेश शहापूरकर आदी उपस्थित होते.

प्रारंभी सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रकाश पायगुडे म्हणाले, जे कठीण आहे ते सोपं करावं, जे सोपं आहे ते सहज करावं, आणि जे सहज आहे त्यावर प्रेम करावं, कवी श्रीकांत मोरे यांनी जे लिहिलं आहे ते मनापासून लिहिलं आहे. त्यांना माझ्या शुभेच्छा.

शैलेंद्र पोळ म्हणाले, श्रीकांत मोरे यांनी अगदी साध्या, सोप्या भाषेत कविता लिहिल्या आहेत. त्यामुळेच त्या मनाला भावतात. त्यांच्या या कवितासंग्रहाला माझ्या शुभेच्छा आहेत.

अशोक काकडे म्हणाले, साहित्याला खूप छटा असतात. खूप प्रकार असतात. मराठी भाषा खूप लवचिक आहे. श्रीकांत मोरे यांच्या कविता खूप उत्कृष्ट आहेत. सर्व विषयावर कवींनी कविता लिहिल्या आहेत. अनिल कवडे म्हणाले, आज श्रीकांत मोरे यांच्या सहा काव्यसंग्रहाचे प्रकाशन होत आहे. त्याबद्दल खूप आनंद होत आहे. निसर्गाशी संबंधित कविता म्हणजे संवेदनशील मनाचं लक्षण आहे. भौतिक विचारसरणी खूप मोठी आहे. विपुल प्रमाणात संतसाहित्य आलं आहे. आमच्या विचारात प्रामाणिकपणा हा पाया असला पाहिजे. त्यातून समृद्धी वाढवली पाहिजे. वाचनाचं प्रमाण खूप कमी होत आहे. साहित्यातून बऱ्याच गोष्टी मिळणार आहेत. आपली संस्कृती जपण्याचं कार्य श्रीकांत मोरे यांनी केलेआहे.

शेखर गायकवाड म्हणाले, साहित्य हे जगण्याशी जोडलं पाहिजे. साहित्य हे शब्द नाही तर ते संवेदनशील मन आहे. काव्य हे वेगळ्यापातळीवर घेऊन जातं. जगण्याची विसंगती साहित्यात आहे. त्यातून कविता निर्माण होते. कवी श्रीकांत मोरे म्हणाले, शस्त्रानं केलेला वार भरून येतो पण शब्दानं केलेला वार भरून येत नाही. साहित्य आम्हाला हेच शिकवतं. उत्स्फूर्त भावनांचा उत्कट आविष्कार म्हणजे कविता. कविता फुलण्यासाठी चांगल्या गोष्टींची विरळणी करावी. साहित्यात कविता विविध अंगांनी फुलण्यासाठी काही तरी घडावं लागतं. त्यातून काव्य निर्माण होते.

प्रारंभी अस्मिता गायकवाड यांनी स्वागत करून केले. सौ. शोभा मोरे यांनी प्रास्ताविक केले. श्वेता हुल्ले यांनी सूत्रसंचालन केले. सुरेश शहापूरकर यांनी आभार मानले. यावेळी रसिक प्रेक्षकांनी सभागृह भरून गेले होते.



## शिवचलेश्वर हायस्कूलमध्ये मराठी राजभाषा दिन साजरा

**अक्कलकोट** : श्री.शिवचलेश्वर हायस्कूल व ज्युनियर कॉलेज मैंदर्गी प्रशालेत कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका श्रीमती जयदेवी उकली होते.कुसुमाग्रज व सरस्वती प्रतिमेचे पूजन प्राध्यापक कारले यांनी केले.यावेळी मंचावर पर्यवेक्षक ए.एच.हरवाळकर वरिष्ठ लिपिक वसंत आरेनवरू, एन.एस. सोनार, आदटराव, आंदेवाडी, एस.ए.कुलकर्णी उपस्थित होते. इ.६ वी अ वर्गातील विद्यार्थीनी सर्वाचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केले. प्रास्ताविकेतून आंदेवाडी यांनी मराठी भाषेचा इतिहास व महत्त्व सांगितले.अनेक विद्यार्थ्यांनी भाषण व गीत,कविता सादर केले.मराठी राजभाषा संवर्धन पंधरवडा निमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आला.पर्यवेक्षक हरवाळकर यांनी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी विष्णु वामन शिरवाडकर यांचा जीवन परिचय तथा मराठी साहित्याची महत्ती व्यक्त केले. प्राध्यापक कारले आपल्या मनोगतातून मराठी भाषेची समृध्द वारसा सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमार अंशुक अमर पराड याने तर आभार प्रदर्शन कुमारी स्मृति शिवानंद मुन्नोळी हिने मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहशिक्षिका एस.ए.कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.



## बामसेफचे वामन मेश्राम यांनी घेतली डॉ.देशमुख यांची भेट

**सांगोला** : बामसेफचे वामन मेश्राम हे सोलापुर जिल्हा दौऱ्यावर आले होते. रविवारी दि. २६ रोजी पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांची सदिच्छा भेट घेतली. सध्या स्व आबासाहेबांसारखे नेते दुर्मिळ झाले आहेत. राजकारणामध्ये निष्कलंक राहुन समाजसेवा करणे फार अवघड काम आहे. हे काम स्व. आबासाहेबांनी संपूर्ण हयातभर केले. आबासाहेबांनी विचारधारा कधींच सोडली नाही.विचारधारेशी तडजोड कधी केली नाही.सांगोला विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करीत असताना तालुक्यांमध्ये सर्वधर्म समभाव रुजवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. डॉ बाबासाहेब देशमुख यांना बोलताना वामन मेश्राम म्हणाले की,आपणास विचारांचा वारसा आहे.आपण आबासाहेबांच्या विचारांवर पाऊल टाकत समाजसेवा करावी तेवढीच अपेक्षा आपणाकडुन ठेवत असलेले म्हणाले. भेटी दरम्यान बहुजन नेते बापुसो ठोकळे,किशोर् बनसोडे,दिपक बनसोडे, आबासाहेब शेजाळ, बशीर्भाई तांबोळी, आकाश व्हटे उपस्थित होते.



## खंडाळीत जिल्हा परिषद शाळेत मराठी राजभाषा दिन साजरा

**वेळापूर** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंडाळी मध्ये मराठी राजभाषा दिन ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रजांचा जन्मदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राजभाषा दिनानिमित्त ग्रंथदिंडी काढण्यात आली तसेच महाराष्ट्र गीत म्हणणे, राजभाषा दिनावर निबंध लिहिणे, कविता गायन स्पर्धा, ग्रंथ वाचन स्पर्धा, असे विविध उपक्रम यावेळी घेण्यात आले. मुख्याध्यापक सारीका महाजन, छाया पोळ, शितल बिराजदार, कविता हिंगमिरे आदिंनी विद्यार्थ्यांना कुसुमाग्रजांविषयी व राजभाषा दिनाविषयी माहिती सांगितली. चौथीच्या मुलांनी सुंदर असा पोवाडा सादर केला. तसेच इयत्ता तिसरी व चौथीच्या मुला मुलींनी महाराष्ट्र गीत सादर केले. सर्व विद्यार्थ्यांना राजभाषा दिनानिमित्त गोड खाऊचे वाटप करण्यात आले.

## मोहोळ येथे ५ मार्चला बौध्द वधु-वर परीचय मेळावा

**मोहोळ** : मोहोळ येथे पंचशील मंडळाच्या वतीने कालकथीत आंजली अशोक पाचकुडवे यांच्या तृतीय स्मृती दिनानिमित्त बौध्द समाजातील वधु वरा साठी वधु वर परीचय मेळाव्याचे रवीवार दिनांक ५ मार्च रोजी आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा येथील कै. शहाजीराव पाटील सभागृह मेन रोड मोहोळ येथे



सकाळी ११ ते ४ या वेळेत घेण्यात येणार आसुन इछूकांनी नाव नोंदणी करण्यासाठी सकाळी ११ वाजता उपस्थीत रहावे असे आवाहन संयोजकानी केले आहे. आधिक माहिती साठी इछूकांनी शशिकांत ठोकळे ९४०४९६९६०४, अशोक पाचकुडवे ९०९६३१०६२६, संजय आठवले ९८५०५२०९३०, शिवाजी आवारे ९०११५२१९६२ यांच्याशी संपर्क साधावा असे संयोजकानी आवाहन केले आहे.

# उजनीत १० टीएमसी पाणी वाढ होणार

## गाळ काढण्यासाठी लवकरच आंतरराष्ट्रीय निविदा निघणार

सुराज्य/सोलापूर

**जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी वरदायणी असणाऱ्या उजनी धरणात साठलेल्या प्रचंड गाळामुळे उपयुक्त पाणीसाठ्यात मोठी घट झाली असून तो गाळ काढल्यास पाणीसाठ्यात मोठी वाढ होणार असून तो गाळ काढण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे, त्याकरता मागवण्यात आलेल्या निविदा,कागदपत्राचे मानक प्रारूप तयार करण्यासाठी राज्य शासनाने समिती स्थापन केली आहे. या समितीला अहवाल देण्याचे आदेश देण्यात आले असून गाळ काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय निविदा काढण्यात येणार आहे.**



मागील तीन वर्षांपूर्वी झालेल्या अभ्यासपूर्ण माहितीनुसार उजनी धरणामध्ये ५० ते ६० हजार मेट्रिक टन गाळ साठलेला असण्याची शक्यता असून हा गाळ बाहेर काढल्यानंतर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये किमान १० टीएमसी पाणी साठा निश्चित वाढेल.उजनी जलाशयामध्ये मृत व जिवंत असा एकूण १० टिएमसी गाळसाठा आहे. गाळ काढल्यानंतर ५३ टिएमसी साठा पुर्नस्थापित होईल. जो कमी झाला आहे. हा गाळ काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय निविदा मागविण्यात येतील. त्यासाठी अटी शर्ती तयार केल्या जातील.

सध्याचे अध्यक्षाची पदोन्नती झाली असल्याने ते रिक्त असून लवकरच त्या ठिकाणी नियुक्ती केली जाणार असून त्यानंतर पुढील प्रक्रिया सुरू होईल अशी माहिती कार्यकारी अभियंता रावसाहेब मोरे यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यातील उजनी, नाशिक जिल्ह्यातील गिरणा, भंडारा जिल्ह्यातील गोसे खुर्द, औरंगाबाद जिल्ह्यातील जायकवाडी व नगर जिल्ह्यातील मुळा या पाच धरणातील गाळ काढण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या कार्यकाळात सन २०१८ मध्ये घेण्यात आला होता, त्यानुसार मागवण्यात आलेल्या निविदा कागदपत्रात संदिग्धता आणि अंतर्विरोध असल्याचा तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यामुळे निविदा प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. सध्या राज्यातील महा विकास आघाडीचे सरकार जाऊन शिवसेना व भाजपा सरकार आले असून पुन्हा देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाल्यानंतर धरणातील गाळ काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे .या कामासाठी मागणीच्या निविदा च्या सुधारित मानक स्वरूप तयार करण्यासाठी स्थापन समिती स्थापन करण्यात आली असुन नाशिक येथील मेरी चे महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली इतर चार जण समितीत गठीत करण्यात आली आहे.या समिती मार्फत निविदा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून अंतिम झाल्यानंतर शासनास सादर करण्यात येईल. शासनाच्या अंतिम मंजुरी नंतर पुढील कारवाई होईल.

# कुरनूर धरण ते वळसंग पाणीपुरवठा पाईपलाईनचे काम अंतिम टप्प्यात

## सरपंच महानंदा दुधगी यांची माहिती

सुराज्य/अक्कलकोट

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील ग्रामपंचायत कडून कुरनूर धरण ते वळसंग पाणीपुरवठा पाईपलाईनचे काम अंतिम टप्प्यात आले असून आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या सहकार्याने युध्द पातळीवर काम चालू असल्याची माहिती सरपंच महानंदा दुधगी यांनी दिली.

कुरनूर पासून १६ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या वळसंग गावाला सहा इंचीचे पाईपलाईन भूमी अंतर्गत घालण्याची काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरात लवकर गावकऱ्यांना फिल्टरचा पाणीपुरवठा करण्यात येईल, असे सांगितले.

वळसंग या पावन नगरीत अक्कलकोटचे स्वामी समर्थ, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भेट दिल्याची इतिहास असून सोलापूरचे चार हुतात्मे पैकी एक हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी यांनी जन्मलेल्या गाव आहे. या गावाला सुजलाम सुफलाम करण्याची संकल्पना वळसंग गावचे नागरिक व ग्रामपंचायतील सर्व पदाधिकारी केल्याने कुरनूर





सरपंच महानंदा दुधगी



उपसरपंच स्वामीनाथ कोडले

धरणाची पाणी पावसाळ्याच्या आधी गावात घरोघरी पोहोचतील, असे आश्वासन सरपंच महानंदा दुधगी व उपसरपंच स्वामीनाथ कोडले यांनी दिले. संपूर्ण गावात प्रत्येक गल्लीत भूमी अंतर्गत पाणीपुरवठा पाईपलाईन योग्य ती पद्धतीने कामे होत आहे. जनसेवा शाळेचे जवळ नवीन पाण्याची टाकी बांधकाम होत आहे.

जनतेला पाण्याची टंचाई पासून कायमची मुक्ती मिळणार आहे. या कामासाठी वळसंग गटातील जिल्हा परिषद सदस्य,व गणातील पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत पदाधिकारी व सर्व सदस्य यांचे बहुमोल सहकार्य असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी दस्तगीर नदाफ यांनी दिले.

## दिलीप माने विद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

सुराज्य/उत्तर सोलापूर

होनसल येथील दिलीप राव माने विद्यालयात २०१० च्यां माजी विद्यार्थी स्नेह मेळावा संस्थापक अध्यक्ष संभाजी भडकुंबे यांच्या अध्क्षतेखाली घेण्यात आला.माजी विद्यार्थ्यांचा कार्यक्रम आयोजित करुन आठवणीला उजाळा देण्यात आला. विविध कार्यक्रम ही घेण्यात आला. यावेळी पंचायत समिती उत्तरचे माजी सभापती रजनी संभाजी भडकुंबे, विशाल खांडेकर, शिक्षक, शिक्षेकेत्तर, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## अंनिसच्या उपक्रमामुळे शाळांमधून जिज्ञासू नागरिक घडतील : डॉ.झाडबुके

सुराज्य/मोहोळ

अनिसने राबवलेल्या या उपक्रमामुळे शाळा शाळा मधून शिकणारे विद्यार्थी निर्भय व जिज्ञासू घडतील असे विचार मोहोळ येथील सुप्रसिद्ध डॉक्टर शैलेश झाडबुक्े यांनी केले

२८ फेब्रुवारी हा दिवस विज्ञान दिन शाळांमध्ये राबवून दससुत्री कार्यक्रमातील पूरक उपक्रमामध्ये भर घालण्या साठी उच्च प्राथमिक शाळेतील व माध्यामिक शाळेतील विद्यार्थ्यांना विज्ञानातील सोपे प्रयोग विज्ञान गीते शिकवून ते विद्यार्थी म्हणजे विज्ञानदूत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रयोग करून दाखवणार व मुलामध्ये विज्ञानाची गोडी निर्माण करणार हा उपक्रम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा मोहोळने राबविला त्यावेळी ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

प्राथमिक जिल्हा सोसायटीच्या सभाग्रहात आयोजित विज्ञान महोत्सव कार्यशाळेसाठी डॉ.शैलेश झाडबुके, डॉ. सानिका झाडबुके, डॉ.सचिन राऊत महाअंनिस राज्यसरचिटणीस सुधाकर काशीद आदि प्रमुख पाहुणे उपस्थित होते. रमेश आदलिंगे, धर्मराज चवरे यांनी मुलांना गुरुत्व मध्य, जडत्व, केशाकर्षण, हातचलाखीचे प्रयोग शिकवले. संजय भोसले यांनी प्रास्ताविक केले तर रमेश आदलिंगे यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजेंद्र मोटे मनोहर गोडसे रमेश साठे तुषार मोटे यांनी परिश्रम घेतले.

## नान्नजमध्ये अन्न सुरक्षा अभियान


**उत्तर सोलापूर** : नान्नज येथे संजय टोणपे यांच्या शेत शिवारात राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान, पौष्टिक तृणधान्य रब्बी ज्वारी २२-२३ अंतर्गत शेती दिन, शास्त्रज्ञ भेटी, आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य दिन साजरा करण्यात आला. उत्तर सोलापूर तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ, नान्नज सरपंच राणी टोणपे, कृषी सहाय्यक मनोहर सिरसट, ब्रह्मदेव शिंगाडे, महाबीज जिल्हा व्यवस्थापक देवरमणी, महाबीज क्षेत्रीय अधिकारी प्रमोद भिंगारे, पठाण यांच्यासह कर्मचारी प्रमुख उपस्थित होते.

तालुका कृषी अधिकारी मिसाळ यांनी आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाचे महत्त्व सांगत उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. फुले रेवती या वाणाबाबत लागवडीचे तंत्रज्ञाना बद्दल कृषी अधिकाऱ्यांनी केले. सूत्रसंचालन व आभार कृषी सहाय्यक मनोहर सिरसट यांनी मानले. यावेळी संभाजी दडे, अनिल भोसले, अभिमन्यू गवळी,हाणमंत टोणपे, शिवाजी आवटे, संजय टोणपे, प्रवीण गवळी, मनोहर चंडके यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी उपस्थित होते.

## डॉ.नितीन बाबर यांच्या 'अर्थप्रवाह'ला उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार

सुराज्य/सांगोला

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र असोसिएशन (सुयेक) आणि बळवंत कॉलेज विटा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३३ व्या वार्षिक अधिवेशनामध्ये डॉ. नितीन बाबर यांच्या अर्थप्रवाह' या पुस्तकास शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र असोसियशनचा अत्यंत प्रतिष्ठेचा 'कुसुमताई राजाराम बापू पाटील 'उत्कृष्ट ग्रंथ परितोषिक सुयेकचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ.अर्जुनराव महाडीक सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.



याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, सुयेकचे विद्यमान अध्यक्ष प्रा.डॉ. राहूल म्होपरे, माजी अध्यक्षा प्राचार्या डॉ तेजस्वीनी मुडेकर, कार्याध्यक्ष प्रा.डॉ.एम. जी. पाटील, शिवार्थ संपादक प्रा.डॉ. जयंत इंगळे, सचिव प्रा.संजय धोंडे, डॉ. प्रविन बाबर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ.बाबर हे सांगोला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत असून सातत्याने त्यांचे शेती, ग्रामीण अर्थकारणावर संशोधनात्मक लेख दै.अ‍ॅग्रोवन, पुण्यनगरी अशा वेगवेगळ्या वर्तमान पत्रात प्रकाशित होत असतात. म्हणूनच यावर्षी सुयेकमार्फत त्यांचा, सन्मानपत्र, व रोख रक्कम देवून गौरव करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल माजी कुलगुरू योगेंद्र नेरकर, माजी मुख्य सचिव डॉ सुधीरकुमार गोयल जेष्ठ राजकीय विश्लेषक प्रा.डॉ. भालबा विभुते, शिवाजी विद्यापीठ अधिष्ठाता प्रा.डॉ. एम. एस. देशमुख जेष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. विजय ककडे यांनी त्यांचे कौतुक केले आहे. त्यांना सांगोला तालुका उच्च क्षिण मंडळाचे अध्यक्ष मा बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष मा.ता. ना. केदार, प्रा.पी.सी. झपके सर तसेच सचिव मा.म.सि. झिरपे व इतर सर्व संस्था सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ सुरेश भोसले, माजी प्राचार्य डॉ कृष्णा इंगोले, डॉ मधूसुदन बचूटे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

महाविद्यालयातील इतर सर्व सहकारी प्राध्यापक व कार्यालयीन अधिक्षक मा पी.एस. शिंदे सर तसेच इतर प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी व चोपडी गावचे ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

## मोहोळचे संतोष सोनार समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

सुराज्य/मोहोळ

खासदार प्रीतम मुंडे यांच्या हस्ते संतोष पंडित सोनार यास समाज रत्न पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. पांचाळ सोनार समाज महामंडळाचे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच बीड येथे झाला.



या कार्यक्रमांत संतोष सोनार याचा सन्मान करण्यात आला. यावेळी जयदीप रत्नपारखी आशिष आनंद महाराज धारूरकर डी वाय एस पी बाबुराव महामुनी रोहिणी पोतदार प्रमोद वेदपाठक अविनाश पंडित व सोनार समाजाच्या अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रम चे प्रस्ताविक महामंडळ उपाध्यक्ष रामानंद तपासे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश पोद्दार, महामंडळ रवी पोद्दार, युवा उप अध्यक्ष निलेश, अमोल हिलाले, श्रीनाथ पोद्दार आदींनी परिश्रम घेतले यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारे समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हन्नूरमध्ये सुरू झाला जनावरांचा आठवडा बाजार

सुराज्य/अक्कलकोट

**पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व कर्नाटक या सीमा भागालगत असलेल्या अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर येथे ज्येष्ठ नेते सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली उपसरपंच सागर कल्याणशेट्टी यांनी पशुपालक व शेतकऱ्यांचे हितसमोर ठेवून पहिल्यांदाच जनावरांच्या आठवडी बाजार भरवला आहे.**

हन्नुर पंचक्रोशीतील व कुरनूर धरणालगत असलेल्या अनेक शेतकरी व पशुपालकाना जनावर, शेळ्या मेंढ्यांचा खरेदी विक्री करण्यासाठी अक्कलकोट, अणदूर व खसगी येथे जाऊन व्यवहार करावा लागत होता. एखाद्या शेतकऱ्याला किंवा पशुपालकांना जनावर, शेळ्या मेंढ्या खरेदी विक्रीसाठी होणारे हाल बघून अक्कलकोट उत्तर भागामध्ये गेल्या अनेक



वर्षापासून हन्नूर येथे मोठ्या प्रमाणात दिवसभर दर बुधवारी आठवडी बाजार भरत आहे.

परंतु जनावरांचा बाजार नसल्याने जनावरांच्या खरेदी विक्रीसाठी पशुपालक व शेतकऱ्यांसमोर खूप मोठे संकट होते. हन्नूर येथे चालू करण्यात आलेल्या जनावरांच्या बाजारामध्ये मराठवाडा, कर्नाटक व सोलापूर जिल्ह्यातील विविध ठिकाणाहून पशुपालकाकडून भरघोसपणे प्रतिसाद मिळत आहे. या बाजारामध्ये अनेक विविध जातीचे खोंड, बैल, शेळ्या मेंढ्या, दुभत्या म्हशी, गाय मोठ्या प्रमाणात येत आहेत.

यामुळे या पंचक्रोशीतील नागरिकासह मराठवाडा व कर्नाटकातील नागरिकांचे ही सोय होत आहे. हन्नूर गावामध्ये व पंचक्रोशीतील ब्ऱ्हाणपूर, डोंबरजवळगे, चप्पळगांव, कुरनूर, पितापूर, चुंगी, नन्हेगाव, बोरेगांव, किणी परिसरामध्ये जातींवत जनावर व मेंढपाळ शेतीसोबत जोडव्यवसाय करणारा मोठा वर्ग आहे. गेल्या दोन वर्षाच्या पाठीमागे हन्नूर गावांमधील एका पशुपालकाने साडेआठ लाख रुपयाला विजापूर जातीची मेंढी विकून विक्रम उत्पन्न घेतले होते. हन्नूर परिसरामध्ये जातींवत जनावर व मेंढ्या सांभाळणारा वर्ग असल्याने या आठवडी बाजारात खरेदी विक्रीची संधी उपलब्ध झालेले आहे, असे परिसरातील नागरिकांत बोलले जात आहे.

### जनावरांचा बाजार भाव

- बैल : ६० हजार ते १ लाख
- जातिवंत खोंड : ७० हजार ते दीड लाख
- शेळ्या : १० हजार ते १५ हजार
- म्हैस : ६० हजार ते १ लाख

हन्नूर गाव व परिसरातील शेतकऱ्यांना कुरनूर धरणामधुन गेल्या दोन-तीन वर्षापासून पाऊस, अतिवृष्टीमुळे पाणी उपलब्ध झाले आहे.यामुळे मोठ्या प्रमाणात बागायत शेतीचे प्रमाण वाढलेला आहे.शेतीसोबत जोड व्यवसाय म्हणून जनावर व शेळ्या मेंढ्यां पशुपालकांची वाढ झालेली आहे. शेतकरी व पशुपालक व गावकऱ्यांचे जनावर खरेदी विक्रीचे अडचण लक्षात घेऊन जागा व पाण्याची सोय करून जनावरांच्या आठवडी बाजार सुरू करण्यात आलेला आहे.

**- सागर कल्याणशेट्टी, उपसरपंच हन्नूर**

सुराज्य सोलापूर Classified

विवाह विषयक

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : **9763624364, 7410553871** (040323)

# आपत्तीग्रस्तांना मिळणाऱ्या मदतनिधीत वाढ

सुराज्य/मुंबई

**रविवारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य आपत्ती प्रतिसाद दरांमध्ये केंद्र सरकारने केलेल्या सुधारणांचा स्वीकार करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधी एसडीआरएफसाठी केंद्र सरकारने निकष आणि दरांमध्ये सुधारणा केल्या असून, त्या सुधारणा स्वीकृत करण्याचा निर्णय सोमवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या सुधारणा सन २०२५-२६ पर्यंत असतील. याबरोबरच या निर्णयाची अंमलबजावणी १ नोव्हेंबर २०२२ पासून होणार आहे.**



राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे आपत्तीग्रस्त कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. केंद्र सरकारने दरांमध्ये केलेल्या सुधारणांची अंमलबजावणी राज्यसरकार करणार आहे.

**हे नवे दर पुढील प्रमाणे असतील- (कंसात जुने दर दिलेले आहेत)**

* मृतांच्या कुटुंबियांना - ४ लाख रुपये (बदल नाही), * चाळीस ते ६० टक्के अपंगत्व आल्यास - ७४ हजार रुपये (५९ हजार १००), * साठ टक्क्यांपेक्षा अधिक अपंगत्व आल्यास - २.५० लाख रुपये (२ लाख), * जखमी व्यक्ती इस्पितळात एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी - १६ हजार रुपये (१२ हजार ७००), * एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी - ५ हजार ४०० (४ हजार ३००), * दोन दिवसापेक्षा अधिक कालावधीकरिता क्षेत्र/घर पाण्यात बुडालेले असल्यास/ घरे पूर्णत: वाहून गेली असल्यास/पूर्णत: क्षतिग्रस्त झाल्यास प्रति कुटुंब - २ हजार ५०० (बदल नाही), * आंबा बागायतदार फवारणी पंपाचा वॉल आणायला गेला इतकेच निमित्त, क्षणात होत्याचे नव्हते झाले, * सामानांच्या नुकसानीकरिता प्रति कुटूंब - २ हजार ५०० (बदल नाही), * पूर्णत: नष्ट झालेल्या पक्क्या/कच्च्या घरांसाठी सखल भागात- १ लाख २० हजार रुपये (९५ हजार १००), * दुर्गम भागातील घरांसाठी - १ लाख ३० हजार (१ लाख १ हजार ९००), * अंशत: पडझड पक्क्या घरांसाठी - ६ हजार ५०० (५ हजार २००), * अंशत: पडझड कच्च्या घरांसाठी - ४ हजार रुपये (३ हजार २००), * झोपडीसाठी - ८ हजार रुपये (४ हजार १००), * मृत दुधाळ जनावरांसाठी - ३७ हजार ५०० ( ३० हजार), * ओढकाम जनावरांसाठी - ३२ हजार रुपये (२५ हजार), * वासरू, गाढव, खेचर आदींसाठी - २० हजार रुपये (१६ हजार रुपये), * मेंढी, बकरी, डुक्कर यासाठी - ४ हजार रुपये (३ हजार), * कुक्कुट पालन - १०० रुपये प्रति कोंबडी, * दहा हजार रुपयांपर्यंत (५० रुपये प्रति कोंबडी, ५ हजार रुपयांपर्यंत), * शेती जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी - ८ हजार ५०० रुपये, २ हेक्टर मर्यादेत (६ हजार ८००), * आश्वासित सिंचनाखालील पिकांसाठी - १७ हजार रुपये प्रति हेक्टरी (१३ हजार ५००), * बहुवार्षिक पिकांसाठी - २२ हजार ५०० रुपये (१८ हजार), * शेतजमिनीच्या नुकसानीसाठी - १८ हजार रुपये प्रति हेक्टरी (१२ हजार २०० रुपये), * दरड कोसळून किंवा जमीन खरडून झालेल्या नुकसानीसाठी - ४७ हजार रुपये, प्रति हेक्टरी. (३७ हजार ५००), * मत्स्य व्यवसाय - बोटींच्या अंशतः दुरूस्तीसाठी - ६ हजार रुपये (४ हजार १००), * अंशतः बाधित जाळ्यांच्या दुरूस्तीसाठी - ३ हजार रुपये (२ हजार १००), * पूर्णतः नष्ट बोटींकरिता - १५ हजार रुपये (९ हजार ६००), * पूर्णतः नष्ट जाळ्यांसाठी - ४ हजार रुपये (२ हजार ६०० रुपये).

---

## गौतमी पाटीलचा तो व्हिडिओ व्हायरल

### रुपाली चाकणकर सरसावल्या, पोलिसांना रोखठोक आदेश

सुराज्य/मुंबई



आपल्या अदाकारीने आणि नृत्याने तरुणाईला भुरळ पाडणारी प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील हिचा आक्षेपार्ह व्हिडिओ काही विकृतांनी सोशल मीडियावर व्हायरल केला.

पुण्यातील एका शोदरम्यान गौतमी कपडे बदलत असताना तिचा व्हिडीओ शूट करुन विकृतांनी तो व्हिडीओ फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर व्हायरल केला. त्यानंतर गौतमीने पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर त्याची दखल राज्य महिला आयोगाने देखील घेतली आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी गौतमीच्या तक्रारीची तत्काळ दखल घेत सायबर पोलिसांना महत्त्वाचे आदेश दिलेत. महिलांबाबतचे सायबर गुन्हे रोखण्याकरिता कृती कार्यक्रम जाहीर करावा, अशी महत्त्वाची सूचना महिला आयोगाच्या अध्यक्षा या नात्याने चाकणकर यांनी सायबर विभागाच्या पोलीस महानिरीक्षकांना केली आहे.

## सावरकरांच्या मूळ गावी संग्रहालयाची उभारणी

**सुराज्य/नाशिक** : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची रविवारी (२६ फेब्रुवारी) पुण्यतिथीनिमित्त भगूर येथील त्यांच्या मूळ गावी त्यांच्या स्मारकाला भेट देण्यासाठी महाराष्ट्रभरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. यावेळी राज्याचे पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनीही या ठिकाणी भेट दिली. या मूळ ठिकाणी लवकरच थीम पार्क आणि संग्रहालयाची उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारतर्फे ५ कोटींच्या निधीची घोषणाही करण्यात आलीये.



## दादांचा व्हिडिओ ट्विट करणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांना अटक

### कोर्टाने झाप झाप झापले, २५ हजारांचा दंडही केला

सुराज्य/मुंबई



भाजप नेते व मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात कथित आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबाबतचा व्हिडीओ ट्विट केल्याने काँग्रेसचे कार्यकर्ते संदीप कुदळे यांची झालेली अटक कारवाई बेकायदा असल्याचा निर्णय मुंबई हायकोर्टाचा दिला आहे. तसेच अवैधरित्या अटकेची कारवाई केल्याबद्दल हायकोर्टाने राज्य सरकारला लावला २५ हजारांचा दंड ठोठावला आहे.

संदीप कुदळे यांची अटक कारवाई बेकायदा ठरवून कोथरूड पोलिस ठाणे आणि वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात नोंद झालेले दोन्ही एफआयआर न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे व न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने रद्दबातल करुन संदीप कुदळे यांना मुंबई हायकोर्टाने मोठा दिलासा दिलेला आहे.

संदीप कुदळे यांच्यावर अवैधरीत्या अटक कारवाई झाल्याबद्दल हायकोर्टाने राज्य सरकारला २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आणि दंडाची ही रक्कम चार आठवड्यांत संदीप कुदळे यांना द्यावी. तसेच ही रक्कम नंतर कुदळे यांच्याविरोधात एफआयआर नोंद होण्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींकडून वसूल करावी, असेही हायकोर्टाने आदेशात स्पष्ट केले. आपली मते मांडणाऱ्या व्यक्तींवर दबाव आणण्यासाठी, त्यांना रोखण्यासाठी किंवा त्यांना छळण्यासाठी कायद्याचा साधन म्हणून वापर केला जाऊ शकत नाही, असे कठोर निरीक्षणही खंडपीठाने आपल्या निर्णयात नोंदवले आहेत.

## ‘बांगर जरा शांत रहा’

### मुख्यमंत्र्यांचा प्रेमळ सल्ला

सुराज्य/मुंबई



आपल्या आक्रमक भूमिकेमुळे कायमच चर्चेत असणारे शिंदे गटातील आमदार संतोष बांगर यांच्या कधी बेताल वक्तव्यामुळे तर कधी आक्रमकतेमुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अनेकदा टिकेला सामोरे जावे लागले आहे. काही महिन्यापूर्वी झालेल्या महाराष्ट्र विधिमंडळ पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी संतोष बांगर यांनी एका उपहारगृहाच्या व्यवस्थापकाच्या कानशिलात लगावली असल्याने विरोधकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारला चांगलंच धारेवर धरलं होतं. याचाच धडा घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यंदाच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कोणताही राडा होऊ नये यासाठी दखल घेतलीय. यासाठी त्यांनी आमदार संतोष बांगर यांना जवळ घेऊन शांत राहण्याचा प्रेमळ सल्ला दिलाय.

संतोष बांगर हे हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरीचे शिंदे गटाचे आमदार आहेत. हिंगोलीचे आमदार संतोष बांगर नेहमी वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत असतात. कधी प्राचार्यांना तर कधी पोलिसांना शिवीगाळ केल्यामुळे बऱ्याच टीकेला सामोरे जावे लागले होते. शिंदे सरकार सत्तेत आल्यापासून संतोष बांगर यांच्या तोडफोडीच्या राजकारणामुळे सतत वादात अडकले आहेत. त्यामुळे संतोष बांगर यांचा भूतकाळ पाहता यंदा शिंदे-फडणवीस सरकारच्या या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कोणतीही चूक होऊ नये यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी बांगर यांना बजावले आहे.

## महाराष्ट्राचा बिहार झालाय, दहशत निर्माण केली जातेय

### नाना पटोलेंचा घणाघात

सुराज्य/मुंबई



भाजपाने महाराष्ट्राचा बिहार केला आहे. पोलिसांच्या मदतीने त्यांनी मतदारांना पैसे वाटले. तडीपार लोकांना सोबत घेऊन कसबा पेठेत दहशत निर्माण केली, असा घणाघाती आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली.

महाराष्ट्रातील काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद कधीच नव्हता. वादाचं वातावरण निर्माण झालं आहे. २ मार्चला येणाऱ्या निकालात महाविकास आघाडीचे दोन्ही उमेदवार जिंकतील, असंही नाना पटोले म्हणाले.

राज्यातील शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत वाईट असून कापूस, धान, तूर, मका, कांदा, सोयाबीन उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. शेतमालाला भाव नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

कांदा रस्त्यावर फेकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली असून शिंदे-फडणवीस सरकार शेतकऱ्यांना धीर देण्यात कमी पडले आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर या सरकारला सभागृहात जाब विचारू व शेतकऱ्यांना मदत देण्यास सरकारला भाग पाडू, असा इशाराही नाना पटोले यांनी दिला.

## उठाव कमी असल्याने कांद्याच्या दरात घसरण


सुराज्य/मुंबई

एपीएमसी बाजारात सोमवारी कांद्याच्या तब्बल १५० गाड्या दाखल झाल्या असून नवीन व जुन्या कांद्याची आवक मोठया प्रमाणात होत आहे. त्यामध्ये कांद्याला उठाव कमी असल्याने बाजारभाव उतरले आहेत. कांद्याचा दर्जा ही घसरला असून पाल्याचा कांदा अधिक येत आहे. त्यामुळे कांद्याच्या दरात घसरण झाली आहे. मागील आठवड्यात प्रतिकिलो १० रु. ते १४ रुपयांनी उपलब्ध असलेला कांदा आता ५-१० रुपयांनी विक्री होत आहे.



## मी अपक्ष अपक्षच राहणार : तांबे

सुराज्य/मुंबई



अपक्ष आमदार सत्यजीत तांबे यांनी अलीकडेच काँग्रेस पक्षातून बंडखोरी केली आहे. शिक्षक व पदवीधर निवडणुकीदरम्यान काँग्रेसमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आल्यानंतर सत्यजीत तांबे यांनी बंडखोरी करत नाशिक पदवीधर मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. या निवडणुकीत सत्यजीत तांबे निवडूनही आले. आमदार झाल्यानंतर सत्यजीत तांबे पहिल्यांदाच अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी विधान परिषदेत दाखल झाले आहेत.

यावेळी त्यांनी आपली भावी वाटचाल कशी असेल? यावर भाष्य केलं आहे. तसेच बंडखोरीनंतर भाजपानं त्यांना ऑफर दिली होती, या चर्चेवरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. एका मीडियाशी संवाद साधताना सत्यजीत तांबे म्हणाले, ‘हे पाहा मी अपक्ष आमदार आहे आणि मी अपक्षच राहणार.

# मूर्तीला धोका, अंबाबाईच्या चेहऱ्यावरील भाव बदलले

## करवीरच्या मंदिरातून धक्कादायक माहिती

सुराज्य/कोल्हापूर

**गेल्या अनेक वर्षांपासून अंबाबाईच्या मूर्तीवर पुरातत्व खात्याकडून वज्रलेप आणि रासायनिक प्रक्रिया करून मूर्ती संवर्धन करण्याचं काम सुरू आहे. मात्र ही प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने होत आहे की काय अशी शंका निर्माण झाली असून गेल्या अनेक वर्षांपासून मूर्तीला स्नान घालणं आणि दुग्धाभिषेक करणं बंद करण्यात आलं आहे.**

**मूर्तीची अवस्था सध्या अत्यंत नाजूक झाली असून मूर्ती संवर्धनाबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे. साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या हजारो लाखो भक्तांचं श्रद्धास्थान श्री करवीर निवासिनी अंबाबाईच्या दर्शनासाठी राज्यातूनच नव्हे तर देशभरातून लाखो भाविक रोज कोल्हापुरात येत असतात. भक्त कित्येक तास रांगेत उभे राहतात. मात्र, अंबाबाईचं सौंदर्य कमी होत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.**



**मूर्तीबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याची गरज**

अंबाबाई मूर्ती संवर्धन आणि वज्रलेपाचे अनेक वेळा प्रयत्न केले गेले आहेत. १९२० साली मूर्तीच्या हातावर तांब्या पडला आणि दुखावला पण तेंव्हापासून तो हात तसाच जोडून ठेवला आहे. मूर्तीची संवर्धन प्रक्रिया अमलात येण्यासाठी २०१५ उजाडलं.

सध्या देवीच्या पाणपत्राचा जो हात आहे, त्या हाताची दोन बोटं पूर्णपणे निघून गेली आहेत. पावलावरील बोट पूर्णपणे निघून गेली आहेत. त्यामुळे मूर्तीबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याची गरज आहे, असं अंबाबाई मूर्ती अभ्यासक प्रसन्न मालेकर यांनी म्हटलं आहे.

### मूर्ती अनेक ठिकाणी भग्न

अंबाबाईची मूर्ती ही प्राचीन काळातील असल्याने आता त्याची झीज होत आहे. तर मूर्ती काही ठिकाणी भग्न झाली आहे. दरम्यान पुरातत्व विभागाने यापूर्वीही वज्रलेप केला आहे. मात्र मूर्तीचे पाय, कंबर, हात आणि चेहरा या ठिकाणी बदल झाल्याचे दिसून येत आहे. दरम्यान शास्त्राप्रमाणे भग्न झालेले मूर्ती पुजू नये असं सांगितलं जातं, मात्र कित्येक वर्ष अंबाबाईची मूर्ती अभिषेक न घालताच पुजली जात आहे. तर भक्तांना देखील लांबून म्हणजेच पितळी उंबराच्या बाहेरून दर्शन दिलं जात आहे.

### मूर्तीला वज्रलेख आणि रासायनिक प्रक्रिया करून संवर्धन

गेल्या अनेक वर्षांपासून पुरातत्व विभागाकडून मूर्तीला वज्रलेख आणि रासायनिक प्रक्रिया करून संवर्धन केलं जात आहे. गेल्या काही महिन्यांपूर्वी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ऑगस्ट - सप्टेंबर दरम्यान देवीच्या ओठांना झालेली दुखापत लपवण्याठी तातडीने १८ आणि १९ सप्टेंबर रोजी एका रात्रीत संवर्धन प्रक्रिया केली. पण त्यानंतर देवीच्या चेहऱ्यावरील पूर्ण भावचं बदलले. त्यानंतर २६ जानेवारीला देवीच्या डाव्या कानाजवळील कपचा निघाला. त्यामुळे श्रीपुजकांनी ही बाब २७ जानेवारी २०२३ रोजी कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.

### करवीर पिठाचे शंकराचार्य काय म्हणाले?

ज्या चुका आहेत देवीला कुठे काय झालं आहे हे दिसू नये म्हणून शासनाने म्हणजेच व्यवस्थापन समितीने लांबून दर्शनाचा खेळ केलेला दिसून येतो. कोणत्याही मंदिरातील देवता ही निट स्वरुपात असलीच पाहिजे. तिच्या दर्शनाने प्रसन्नता प्राप्त व्हायला पाहिजे. जर तिच्या अंगाचे व्यंग होत असेल तर प्रसन्नता तर होणारच नाही पण भक्तांना क्लेश मात्र नक्की होतात. आपण कोणाचे दर्शन घेतो हे भक्तांना कळालं नाही तर हे बरोबर नाही. इतक्या लांबून लोक दर्शनाला येतात, त्यांना जर असं विकृत स्वरुप दिसायला लागलं तर ते योग्य नाही, असं करवीर पिठाचे शंकराचार्य विद्यानृसिह भारती यांनी म्हटलं.

## मूसेवाला हत्याकांडातील आरोपींमध्ये हाणामारी, दोघांचा मृत्यू

सुराज्य/मुंबई



पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला हत्या प्रकरणातील तीन आरोपींमध्ये तरनतारन येथील गोइंदवाल साहिब कारागृहात हाणामारी झाली आहे. या घटनेत दोन आरोपींचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी आहे. मनदीप तुफान आणि मनमोहन सिंग, अशी मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत. तर केशव नावाचा एक आरोपी या घटनेत गंभीर जखमी झाला आहे. त्याला उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. कारागृह प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार रविवारी संध्याकाळच्या सुमारास ही घटना घडली.

पंजाब पोलिसांतील वरिष्ठ अधिकारी डीएसपी जसपाल सिंह ढिल्लन यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी संध्याकाळी सिद्धू मूसेवाला हत्याकांडातील आरोपी मनदीप सिंग तुफान, मनमोहन आणि केशव यांच्यात वाद झाला. काही वेळातच या वादाचे रुपांतर हाणामारीमध्ये झाले. तिघांनी एकमेकांवर लोखंडी रॉडने हल्ला केला. या घटनेत तिघेही कैदी गंभीर जखमी झाले. त्यानंतर तिघांनाही कारागृह प्रशासनाने तत्काळ रूग्णालयात दाखल केले. मात्र, त्यापूर्वीच मनदीप आणि मनमोहन यांचा मृत्यू झाला. तर केशव गंभीर जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

पंजाबी गायक सिद्धू मूसेवालाची गेल्या वर्षी २९ मे रोजी मानसा जिल्ह्यात गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सदस्य सतींदरजीत सिंग उर्फ गोल्डी ब्रार याने सिद्धूच्या हत्येची जबाबदारी घेतली होती. याप्रकरणी काही दिवसांपूर्वी मनदीप तुफानला पोलिसांनी गँगस्टर मनी रियासह अटक केली होती.

# सूरत-चेन्नई महामार्गाचा दर शासनाच्या धोरणानुसार : जिल्हाधिकारी

## १५ मार्चपर्यंत भूसंपादनाची सर्व प्रक्रिया होणार

✔ सुराज्य/सोलापूर

**सुरत-चेन्नई महामार्गबाधित शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मोबदला वरून शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे.जमिनीचा मोबदला देण्यासाठी रेडिरेकनर किंवा संबधित जमिनीच्या परिसरातील खरेदी-विक्रीच्या दरावरून मोबदला ठरविला आहे. दर योग्यच आहे शासनाच्या धोरणानुसार महामार्गाचा दर ठरला असल्याचे जिल्हाधिकारी शंभरकर यांनी सांगितले.**



सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर व बार्शी तालुक्यातून प्रस्तवित सुरत-चन्नई हा महामार्ग जात आहे. या महामार्गसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला वरून शेतकरी नाराज आहेत. समृध्दीच्या धरर्तीवर पाच पट देण्याची मागणी आहे. वाढीव दर देण्याची शतकऱ्यांची मागणी आहे. अक्कलकोट, दक्षिण सोलापूर तालुका येथून मोठा विरोध होत आहे. प्रशासनाकडून दिलेल्या नोटीसाची होळी केली जात आहे. साठी काही शेतकऱ्यांनी केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन कैफित देखिल मांडली.

मात्र गडकरी यांनी हा चेंडू जिल्हाधिकारी यांच्या कोर्टात टोलवला आहे. याबाबत जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना विचारणा केली असता जिल्हाधिकारी म्हणाले मोबदला देण्यासाठी रेडिरेकनर किंवा संबधित जमिनीच्या परिसरातील खरेदी-विक्रीच्या दरावरून मोबदला ठरविला जातो. शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार रेडिरेकनर किंवा संबधित जमिनीच्या परिसरातील खरेदी-विक्रीच्या दर यापैकी जे अधिक असेल त्याला गुणांक एक किंवा दोन याप्रमाणे मोबदला देण्यात येत आहे. या परिसरात यापूर्वी झालेल्या जमिनीचे व्यवहाराची शासकिय किंमत काही ठिकाणी दीड लाख तर काही ठिकाणी दोन लाख एकरी दाखविण्यात आलेली आहे. यामुळे या परिसरातील बाधित शेतकऱ्यांना आता त्याचा फटका बसत आहे.

### स्टॅम्पड्युटी वाचवण्याच्या नादात फटका

यापूर्वी या परिसरात झालेल्या खरेदी विक्री दरावरून मोबदला ठरविण्यात आला आहे. यापूर्वीच्या खरेदी-विक्री व्यवहरात खरेदीदारांनी स्टँपड्यूटी वाचविण्यासाठी जमिनीच्या किमती कमी दाखवल्यामुळे मोबदला कमी मिळत आहे. यापूर्वीच्या खरेदी-विक्री स्टँपड्यूटी वाचवण्याचा फटका आता बाधित शेतकऱ्यांना बसत आहे.

### शासकीय धोरणानुसार मोबदला

सुरत-चेन्नई महामार्गासाठी शासनाने जे धोरण ठरविले त्याप्रमाणेच मोबदला देण्यात येत आहे. आजुबाजूच्या जमिनीच्या किमतीवरून मोबदला ठरविण्यात आला आहे. १५ मार्चपर्यंत भूसंपादनाची सर्व प्रक्रिया पूर्ण होईल.

**- जिल्हाधिकारी शंभरकर**

# पालकमंत्री विखे-पाटील शनिवारी सोलापूर दौऱ्यावर

✔ **सोलापूर** : सोलापूर जिल्हाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे - पाटील सोलापूर जिल्हाच्या दौऱ्यांवर येत आहे. शनिवारी सकाळी त्यांचे शहरात आगमन होणार आहे. नियोजन भवन येथे शहर जिल्हाच्या विकासाच्या आराखड्याचा आढावा घेणार आहेत. कोल्हापुर येथे नुकतीच महसुल परिषद झाली त्यानंतर प्रथम विखे-पाटील जिल्हाच्या दौऱ्यांवर येत आहेत.



१३ जानेवारी रोजी सोलापूर जिल्हाच्या दौऱ्यांवर पालकमंत्री आले होते. त्यावेळी त्यांनी जिल्हानियोजन समितीचा आढवा घेऊन शहर व जिल्ह्याची बलस्थाने ओळखून रोजगार व धार्मिक पर्यटनावर भर देत सोलापूर जिल्ह्याची ब्रँड व्हॅल्यू निर्माण करण्यासाठी सोलापूरच्या विकासासाठी स्वतंत्र आराखडा तयार करण्याच्या सुचना पालकमंत्र्यांनी प्रशासनास दिल्या होत्या याचा आढवा घेण्याची शक्यता आहे. तसेच चालू आर्थिक वर्षाकरिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) साठी ५०२.९५ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजनासाठी १५१ कोटी रुपये, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनासाठी ४.२८ कोटी रुपये असा एकूण ६५८.२३ कोटी रुपयांचा आराखडा प्रस्तावित करण्यात आला होता. या प्रारूप आराखड्यास समितीसमोर सादर करण्यास मान्यता दिली. तसेच अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत सादर करण्याच्या अनुषंगाने १६६ कोटी रुपयांच्या अतिरिक्त मागण्यांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. आणखी निधी वाढवून मिळण्यासाठी प्रयत्न केला जाणार होता याबाबतचा देखिल आढवा पालकमंत्री घेण्याची शक्यता आहे.

# वाढत्या उन्हामुळे जि.प.च्या शाळा ५ मार्चपासून सकाळी भरणार



✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या शाळा ५ मार्चपासून सकाळच्या सत्रात भरणार आहेत. उन्हाचा तडाखा आता दिवसेंदिवस वाढू लागला असून दरवर्षीप्रमाणे यंदाही उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर, जिल्हा परिषदेच्या सर्वच शाळा सकाळी साडेसात ते साडेअकरा वाजेपर्यंत भरणार आहेत.

विद्यार्थ्यांना उन्हाचा त्रास होऊ नये, या हेतूने हा निर्णय घेतला आहे. दरवर्षी उन्हाळ्यात सोलापूर जिल्ह्याचे तापमान प्रचंड असते. उन्हाळ्यात सर्वाधिक तापमान असलेल्या राज्यातील टॉपटेन जिल्ह्यांमध्ये सोलापूर नेहमीच अव्वल राहिला आहे. गेल्या आठ दिवसांपासून शहराचे तापमान ३६ ते ३७ अशांपर्यंत गेले आहे. उन्हाचे चटके चिमुकल्यांना बसणार नाहीत, याची खबरदारी शालेय शिक्षण विभागाकडून दरवर्षीच घेतली जाते. मात्र वर्षभरातील सार्वजनिक तथा शासकिय सुट्ट्यांचा विचार करून कधीपासून सकाळच्या सत्रात शाळा भरवता येईल, याचा कृती आराखडा तयार केला जातो. यंदा ५ मार्चपासून सकाळच्या सत्रात शाळा सुरु होणार आहेत.

### दोन हजार ९९७ शाळा सकाळच्या सत्रात

कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या दोन हजार ९९७ शाळा सकाळच्या सत्रात भरतील. १ मार्च की ५ मार्चपासून शाळांच्या वेळा बदलतील, यासंदर्भातील अंतिम निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी पुढील आठवड्यात घेतील. त्यानंतर सर्व शाळांमध्ये त्या निर्णयानुसार अंमलबजावणी केली जाईल.



# भाजपचे माजी नगरसेवक सुनील कामाठी यांचे निधन

✔ सुराज्य/सोलापूर

भाजपचे माजी नगरसेवक आणि खड्डा तालीम शिवजन्मोत्सव मंडळाचे संस्थापक सुनिल कामाठी (वय ४३) यांचे सोमवारी निधन झाले. त्यांच्यावर दोन दिवसांपासून खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. सोमवारी सकाळी उपचारा दरम्यान त्यांचे निधन झाले.

सुनिल कामाठी यांनी खड्डा तालीमच्या माध्यमातून मोठे संघटन उभे केले होते. माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांचे खंदे समर्थक अशी त्यांची ओळख होती. महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेशातील ६०० हून श्री शिवजन्मोत्सव मंडळांना शिवाजी महाराजांच्या सिंहासनाधिष्ठित मूर्तींचे वाटप त्यांनी केले होते. माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांच्या माध्यमातून प्रभागाच्या विकासासाठी त्यांनी निधी आणून विकासकामे केली होती. कामाठी यांच्या निधनाची वार्ता कळताच माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांनी अधिवेशनातून तातडीने सोलापूरला धाव घेतली. निधनाचे वृत्त कळताच त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी सर्वपक्षीय नेते, हजारो कार्यकर्ते, समाजातील विविध स्तरांतील नागरिक मोठ्या संख्येने निवासस्थानी एकत्र झाले होते. सोमवारी सायंकाळी ५ वाजता अंत्ययात्रा सुरु झाली. यावेळी त्यांच्या समर्थकांची मोठी गर्दी झाली होती. मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, वहिनी, पुतणे असा परिवार आहे.

# जि.प.चे अंदाजपत्रक १३ मार्चला होणार सादर

### मुख्य कार्यकारी अधिकारी कोहिनकर यांची माहिती

✔ **सोलापूर** : सोलापूर जिल्हा परिषदेतील स्वउत्पन्नाचे सन २०२२-२३ चे सुधारित व सन २०२३-२४ चे मूळ अंदाजपत्रक मंजूरीसाठी प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली १३ मार्च २०२३ रोजी दुपारी २ वाजता होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेत सादर होणार आहे, अशी माहिती सीईओ संदीप कोहिनकर यांनी दिली.



मार्च २०२२ मध्ये माजी अर्थ व बांधकाम समिती सभापती विजयराज डोंगरे यांनी सेस फंडातील ४२ कोटींचे बजेट सादर केले होते. तेव्हापासून आजपर्यंत जिल्हा परिषदेवर प्रशासक नियुक्त आहे. यंदाही ४२ कोटींच्या बजेटची शक्यता आहे. मागील काही वर्षांपासून सेस फंडामध्ये घट होत चालल्याचे चित्र आहे. सेस फंड किंवा उत्पन्न वाढीसाठी तितका प्रयत्न होताना दिसत नाही.समाज कल्याण, कृषी, पशुसंवर्धन, महिला व बालकल्याण या विभागात वैयक्तिक लाभाच्या योजना आहेत. परंतु समाज कल्याण मध्ये अद्यापही खरेदी झाली नसल्याने निधी अखर्चित पडून आहे पाठोपाठ राज्य सरकार आणि नंतर जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प मांडण्याची आतापर्यंतची पद्धत आहे. राज्याचा अर्थसंकल्प मार्चच्या पहिल्या आठवड्यात सादर केला जाणार आहे. त्यानंतर 'झेडपी'चा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. प्रशासन या अर्थसंकल्पात जिल्ह्यातील ग्रामीण जनतेसाठी कोणत्या योजना ठेवणार आणि कोणत्या योजनेतून जनतेला खूश करणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# लग्नकार्यातून चोरट्याने सोन्याचा हार पळवला

✔ **सोलापूर** : चोरट्याने ४० ग्रॅम वजनाचा चार पदरी सोन्याचा चप्पल हार चोरून नेल्याची घटना दि.२५ फेब्रुवारी रोजी सकाळी माधव नगर साईबाबा मंदिर जवळ कुमठा नाका येथे घडली.याप्रकरणी स्वाती निखिल मादस (वय-२५,रा. जोडभावी पेठ,नेताजी नगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. स्वाती या लग्नकार्यासाठी आई राधा तिरुपती पेंटी यांच्या घरी आल्या होत्या.त्यावेळी कार्यक्रमांमध्ये त्या सोन्याचा हार घेऊन आल्या. तो हार त्यांच्या बॅगेत ठेवून झोपी गेल्या होत्या. परंतु दुसऱ्या दिवशी बॅगेमधील हार दिसून आला नसल्याने सर्वत्र शोध घेतला. मात्र तो मिळाला नाही. चोरट्याने सोन्याच्या दागिन्याचा हार चोरून नेला आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोसई माळी हे करीत आहे.

## महिलेचे मिनी गंठण पळवले

✔ **सोलापूर** : प्रताप नगर रस्त्यावरून जात असताना एका महिलेच्या गळ्यातील ५० हजार रुपये किमतीचे दीड तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण दुचाकी वरून भरधाव वेगाने आलेल्या इसमाने इसका मारून तोडून घेऊन गेल्याची घटना दि.२५ फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सुरेखा संजय पवार (वय-३२,रा.प्रताप नगर तांडा झोपडपट्टी,सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दुचाकी स्वाराविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास सहायक फौजदार मोरे हे करीत आहेत.

## चालकावर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी ट्रॅक्टरच्या लाखाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.२१ फेब्रुवारी रोजी रात्री सैफुल जवळील स्पा शोरूमसमोर घडली. याप्रकरणी महेश लक्ष्मण पाटील (वय-३३, रा.मु. संजवाड) यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ट्रॅक्टर क्रमांक क्र.केए.२८. टीसी.२७०३ या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. काशिनाथ बाबुराव बिराजदार यांना पाठीमागून आलेल्या वरील ट्रॅक्टर क्रमांकाच्या चालकाने धडक दिली. यात काशिनाथचा मृत्यू झाला. घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार फुलारी हे करीत आहेत.

# बंधारे दुरुस्त करा, कालव्यांची स्वच्छता त्वरित करा : आ.देशमुख

✔ **दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलपूर मतदारसंघातील सिंचन कामे, पर्यटन स्थळ व तिर्थक्षेत्र विकास आराखडा आढावा बैठक जपसंपदा विभागाचे अधिकाऱ्यासमेवत आमदार सुभाष देशमुख यांनी घेतली. यावेळी आ.देशमुख यांनी भीमा-सीना जोड कालवा, बंधारे दुरुस्ती, कालवा स्वच्छता, प्रस्तावीत वडापूर बॅरेजसह अन्य ठिकाणचे बॅरेज, संरक्षक भिंती व घाट बांधणे , होटगी तलाव व कुंडल संगमचा पर्यटनस्थळ विकास यावर प्राधान्याने चर्चा करून अधिकाऱ्यांना सूचना केल्या.



दक्षिणमधील ल भीमा व सीना नदीवर बांधण्यात आलेले को.प.बंधाऱ्यातून होणारी गळती थांबवा, पाणी अडविण्यासाठी वापरात असलेले लोखंडी बर्गेचा त्वरीत पुरवठा करावा, दोन्ही नद्यांच्या घाट व संरक्षक पुरसंरक्षक भिंती बांधण्याचा प्रस्ताव करावा, देगांव जलसेतूचे रेल्वेमार्गावरील काम जूनअखेर काम पूर्ण करावे, उजनीचे शाखा कालवा दुरुस्ती व स्वच्छता करावी, सीतामाई तलाव भरण्यासाठी केलेल्या कालव्यावर मुख्यद्वार उभारणीचे कामा दोन महिन्यान काम पूर्ण करावे, भंडारकवठे गावास असणाऱ्या पुरसंरक्षक बांधाची रुंदी व उंची वाढवावी, याला ४ कोटी खर्च येईल, एवढा निधी जि.प.कडून शक्य नसलेने हे काम लाक्षेत्र विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावे, भीमा-सीना जोड कालव्यास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळावे, पुढील अधिवेशनापूर्वी अंदाजपत्रक तयार करून शासनास सादर होईल असे नियोजन करावे.

होटगी तलाव परिसर पर्यटन स्थळ म्हणून विकसित करायचा आहे. जलसंपदा विभागाने तातडीने पर्यटन विभागास ना हरकत प्रमाणपत्र द्यावे, हत्तरसंग-कुडल संगम येथील बंधारा व घाट बांधण्याची अंदाजे किंमत तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागास कळवावी, यासह विविध सूचना आमदार सुभाष देशमुख यांनी अधिकाऱ्यांना केल्या. या बैठकीस लोकमंगल बँकेचे संचालक इंजि. प्रसाद कांबळे, जलसंपदा विभागाचे धीरज साळे, कार्यकारी अभियंता नारायण जोशी, रमेश वाडकर, मोहन जाधवर, स्नेहाल गावडे, पाटकर, फरीद मुजावर व प्रकाश बाबा यांच्यासह तालुक्यातील नागरिक उपस्थित होते



# अंगणवाडी सेविकांचे धान्य दाखवा आंदोलन

✔ सुराज्य/सोलापूर

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकिय सेवेचा दर्जा दया, तसेच भरघोस मानधन वाढ करा, कामासाठी लागणारे मोबाईल त्वरीत दया या मागण्यांसाठी राज्यात अंगणवाडी सेविकांनी आंदोलन पुकारले आहे.

सोमवारी जिल्हा परिषदेसमोर त्यांनी हातात धान्य दाखवत यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. अंगणवाडी सेविकांकडून काळ्या साड्या घालून शासनाचा निषेध करण्यात येत आहे. सोमवारी आंदोलनाचा सहावा दिवस होता. सर्व अंगणवाडी सेविकांनी हातामध्ये गहू, ज्वारी, तांदूळ, साखर, चहापत्ती, डाळी घेऊन आल्या होत्या. हातात धान्य दाखवत यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. राज्य कार्याध्यक्ष सुर्यमणी गायकवाड यांनी आपली भूमिका स्पष्ट करत महागाई आज गगनाला भिडली आहे, तुटपुंज्या मानधनावर सेविका कशा जगणार, आंदोलनाचा सहावा दिवस आहे सरकारला जाग येत नाही या शब्दात संताप व्यक्त केला. अंगणवाडी कर्मचार्यांकडून गेल्या सात ते आठ दिवसापासून बेमुदत संप करुन आंदोलन सुरु आहे. मात्र याविषयी सरकार दखल घेत नाही. त्यामुळे अंगणवाडी कर्मचारी आणखी आक्रमक झाल्या असून, येत्या काही दिवसात मागण्या मान्य न झाल्यास मंत्रालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा अंगणवाडी सेविकांनी दिला आहे.

# महापालिकेची कामे नोंदणीकृत मक्तेदारांना मिळावीत

### ▸ चेतन नरोटे आणि अमोल शिंदे यांची मागणी



सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेमधील कामे एकत्रित (क्लबिंग) करून टेंडर प्रक्रिया राबवू नये, प्रत्येक कामाचे इस्टीमेट प्रमाणे टेंडर प्रक्रिया राबवावी जेणेकरून महानगरपालिकेडील नोंदणीकृत मतेदारांना कामे मिळावित अशी मागणी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे व शिवसेना जिल्हा प्रमुख अमोल शिंदे यांनी महापालिका आयुक्त शीतल तेली उगले यांची भेट घेऊन केली.

महापालिकेत दुपारी चेतन नरूटे आणि अमोल शिंदे आपल्या कार्यकर्त्यांसमवेत एकत्र आले. त्यांनी आयुक्तांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. नगरोत्थान योजनेमधून २२ कोटींची कामे मंजूर आहेत. ती कामे महापालिका तीन ते चार मक्तेदारांनाच देणार होती. नरोटे आणि अमोल शिंदे यांनी ही कामे ठराविक मक्तेदारांना न देता महापालिकेच्या सर्व २५० ठेकेदारांना द्यावी, जेणेकरून त्यांचा उदरनिर्वाह होईल, अशी मागणी केली. तसेच महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील कर्मचाऱ्यांच्या पगारी वेळेवर होण्यासाठी आयुक्तांनी बजेटमध्ये रकमेची तरतूद केल्याबद्दल दोघांनी त्यांचे आभार मानले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त विक्रम पाटील, श्रीराम पाटील, विद्या पोळ, मछिंद्र घोलप, नगरअभियंता लक्ष्मण चलवादी, तसेच मक्तेदार, महापालिकेचे कर्मचारी, परिवहन कर्मचारी, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# वकिलाकडे घेऊन गेल्याच्या कारणावरून मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर

तुम्ही आमच्या सासऱ्यांना वकिलांकडे का घेऊन गेलात या कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना २४ फेब्रुवारी रोजी घोडातांडा येथे सकाळी घडली. याप्रकरणी सोनाबाई रामचंद्र जाधव (वय-६२,रा.घोडा तांडा,दक्षिण सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. राजू चांगदेव चव्हाण, संजयकुमार चांगदेव चव्हाण, संतोषकुमार चांगदेव चव्हाण, सचिनकुमार चांगदेव चव्हाण, अमितकुमार चांगदेव चव्हाण (रा.मानपाडा जिल्हा ठाणे) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. वरील लोकांनी सोनाबाई जाधव यांना शिवीगाळ करून दमदाटी करत घरात घुसून घरातील सर्वांना मारहाण केलेली आहे. सोनाबाई यांच्या गळ्यातील दीड तोळ्याचे मणी मंगळसूत्र गहाळ झाले आहे. तपास पोलीस हवालदार पुगे हे करीत आहेत.